CARNEGIE INDIA

WORKING PAPER

मार्च २०२१

# गलवाननंतर : भारत-चीन संबंधांचे भविष्य

विजय गोखले

CARNEGIE ENDOWMENT FOR INTERNATIONAL PEACE

# गलवाननंतर :
# भारत-चीन संबंधांचे भविष्य

विजय गोखले

या वर्किंग पेपरचा अनुवाद पूनम छत्रे यांनी केला आहे.

© 2021 Carnegie Endowment for International Peace. All rights reserved.

Carnegie does not take institutional positions on public policy issues; the views represented herein are those of the author(s) and do not necessarily reflect the views of Carnegie, its staff, or its trustees.

No part of this publication may be reproduced or transmitted in any form or by any means without permission in writing from Carnegie India or the Carnegie Endowment for International Peace. Please direct inquiries to:

Carnegie Endowment for International Peace
Publications Department
1779 Massachusetts Avenue NW
Washington, D.C. 20036
P: + 1 202 483 7600
F: + 1 202 483 1840
CarnegieEndowment.org

Carnegie India
Unit C-5 & C-6, Edenpark,
Shaheed Jeet Singh Marg
New Delhi - 110016, India
P: + 011 4008687
CarnegieIndia.org

This publication can be downloaded at no cost at CarnegieIndia.org.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संक्षेप | 1 |
| विषय प्रवेश | 3 |
| भारत-चीन संबंधांची थोडक्यात पार्श्वभूमी | 3 |
| चीन आणि भारताची बदलती परराष्ट्र धोरणे | 5 |
| चीन आणि भारताचे नवीन नेतृत्व | 9 |
| भारत-चीन-अमेरिकेचा त्रिकोण | 13 |
| गलवाननंतर पुढे काय | 16 |
| तात्पर्य | 18 |
| लेखकाविषयी | 20 |
| संदर्भ | 21 |

# संक्षेप


१५ जून, २०२० रोजी भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये झटापट झाली ज्यामध्ये वीस भारतीय सैनिकांचा मृत्यू झाला, तर नेमक्या किती चिनी सैनिकांचा जीव गेला याचा आकडा समजू शकला नाही. गलवान नदीच्या कडेने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरून (लाईन ऑफ ॲक्च्युअल कंट्रोल- LAC) दोन्ही बाजूंमध्ये एक व्यापक वाद आहे, ज्याचे निराकरण अजून झालेले नाही. ही झटापट त्याच मोठ्या वादाचा एक छोटा भाग आहे. भारताच्या धोरणकर्त्या समूहातल्या बहुतांश जणांचे यावर एकमत आहे, की या सीमेवरच्या वादामुळे भारत-चीन संबंधांमध्ये दुराराध्य बिघाड होण्याची सुरुवात झालेली आहे. १९८८ मध्ये भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी बीजिंगला भेट दिल्यानंतर जे संबंध निर्माण झालेले होते, ते आता संपुष्टात आलेले नसले, तरी त्यांना धक्का मात्र निश्चितपणे बसलेला आहे, असे या समूहाचे मत आहे. पण हे दोन देश आपसांतल्या संबंधांच्या इतक्या नीचांकी बिंदूपर्यंत कसे काय पोचले, आणि त्याही पुढे जाऊन, गलवान संघर्षाचा चीन-भारत संबंधांच्या भविष्यावर काय परिणाम होणार आहे?

हा लेख असे प्रतिपादन करतो, की सध्याचा चालू असलेला सीमावाद सुरू होण्याच्या बऱ्याच आधीपासून दुसऱ्या बाजूने मोठ्या प्रमाणावर करून घेतलेल्या गैरसमजुतींमुळे चीन-भारत संबंध गढूळ होत चाललेलेच होते. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये परस्पर विश्वास उरला नव्हता. एकमेकांच्या नेमक्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाकांक्षा समजून घेण्यात दोन्ही देश कमी पडल्यामुळे या सर्वात कळीच्या मुद्द्यावरूनच गैरसमज निर्माण झाले. त्यातूनच ही भीती निर्माण झाली, की दोन्ही देशांची परराष्ट्र धोरणे एकमेकांच्या विरोधात आखली गेलेली आहेत. गलवान वादामुळे या संबंधांचे भविष्य काय असेल याचा विचार करण्याच्या आधी, या गैरसमजुतींमुळे चीन-भारत संबंधांवर कोणता परिणाम झालेला आहे आणि ते गैरसमज कसे वाढत गेले आहेत याचा आढावा या लेखात तीन टप्प्यांतून घेण्यात आलेला आहे.

पहिला टप्पा आहे २००८ च्या आर्थिक संकटानंतर लगेचचा, जेव्हा चीनने त्याच्या वाढत्या जागतिक महत्त्वाकांक्षांना सामावून घेईल अशा परराष्ट्र धोरणाची फेरआखणी केली. चीन आपली जागतिक भूमिका विस्तारत गेला, पण त्याचवेळी त्याने केलेल्या या बदलाचा भारतावर काय परिणाम होईल हे त्याने विचारात घेतले नाही. परिणामस्वरूप, त्याच्या पुनर्रचित परराष्ट्र धोरणाचे नवी दिल्लीत स्वागत झाले नाही. उलट, चीन भारताच्या स्वारस्याच्या विषयांवर मुद्दाम कुरघोडी करायचा प्रयत्न करत आहे अशी भीती निर्माण झाली. मग, नवी दिल्लीतून या धोरणाला प्रत्युत्तर देणारे नवे धोरण जाहीर झाल्यावर बीजिंगमध्ये त्याची प्रतिकूल प्रतिक्रिया उमटली, कारण त्यांच्या नव्या परराष्ट्र धोरणामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय हितसंबंधांना कशा पद्धतीने बाधा पोचत आहे हेच त्यांना समजत नव्हते. एकमेकांच्या धोरणांना दिलेल्या या अशा पद्धतीच्या प्रतिक्रिया आल्यामुळे चीन-भारत संबंधांत पुढच्या वाढलेल्या गैरसमजुती आणि त्यामुळे निर्माण झालेल्या अविश्वासाच्या भावनेची पहिली झलक मिळाली.

बीजिंग आणि न्यू दिल्लीच्या नवीन नेत्यांमधले संबंध आणि या बदलामुळे एकमेकांच्या परराष्ट्र धोरणाबद्दलचा संशय कसा बळावत गेला, याचा अभ्यास दुसऱ्या टप्प्यामध्ये करण्यात आलेला आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला एक नूतन दिशा दिली, ज्यामुळे नवी दिल्ली चीनवर मर्यादा आणू पहात आहे ही चीनची समजूत आणखी घट्ट होत गेली. आधीच्या प्रशासनाने चीन-भारत संबंध अधिकाधिक मजबूत करण्यावर भर दिलेला होता आणि मोदी सरकारलादेखील तसेच बळकटीकरण पुढेही करण्यात रस होता. पण इतर शेजारी देशांशी अधिक दृढ संबंध ठेवण्याचे भारताचे धोरण आणि अमेरिकेबरोबर भारताचे असलेले घनिष्ठ संबंध यांकडे चीनकडून नकारात्मक दृष्टीने पाहिले गेले. याच गैरसमजुतींच्या आधारावर बीजिंग भारताप्रती अधिकाधिक आक्रमक व्हायला लागला, ज्याचा परिपाक २०१७ साली डोकलामच्या सीमेवर झालेला वाद आणि चीनच्या नौदलाची हिंदी महासागरात वाढलेली हालचाल यात झाला. चीनच्या या कृतींमुळे नवी दिल्लीत असा समज वाढीस लागला, की भारताने प्रयत्न केले तरीही चीन भारताच्या आंतरराष्ट्रीय स्वारस्यांबद्दल संवेदनशील नाही. त्याचबरोबर चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या सरकारबद्दलही भारतात नकारात्मक प्रतिमा व्हायला लागली. या सगळ्यामुळे २०१८ उजाडले तेव्हा गैरसमजुती आणि अविश्वास ही चीन-भारत संबंधांची व्यापक लक्षणे झालेली होती.

या अशा परिस्थितीत इन्डो-पॅसिफिक (हिंदी-प्रशांत) संबंधांबद्दल चीन-भारत दृष्टीकोनांचे कसे जोरदार प्रकटीकरण झाले याचा ऊहापोह या लेखाच्या अंतिम टप्प्यामध्ये करण्यात आलेला आहे. इन्डो-पॅसिफिक प्रदेशात अमेरिका-भारत यांमध्ये असलेले सहकार्य पाहून बीजिंगच्या धोरणकर्त्यांनी तीव्र

प्रतिक्रिया दिली आणि त्याला “प्रतिबंध” असे नाव दिले. हिंदी महासागराच्या संपूर्ण प्रदेशात भारताचा प्रभाव वाढत आहे, कारण आंतरराष्ट्रीय पातळीवर एक वेगाने वाढणारा देश या दृष्टीने भारताकडे पाहिले जात आहे, हे चीनला स्वीकारार्ह होत नव्हते. त्याऐवजी, चीनने त्याच्या स्वत:च्या नौदलाच्या विस्तारासाठी हिंदी महासागरातल्या कारवाया आवश्यकच आहेत असे कारण पुढे केले. चीनच्या दृष्टीने असे करणे गरजेचे होते, कारण त्याचा समज असा झाला, की अमेरिका आणि त्याचे मित्रदेश चीनच्या सामरिक स्थानावर बंधने आणू पहात आहेत.

एकमेकांचे आंतरराष्ट्रीय स्थान काय आहे हे प्रत्येक बाजूने नेमकेपणाने समजून न घेतल्यामुळे हे गैरसमज कुठपर्यंत पोचले आणि त्यामुळे चीन-भारत संबंधांमधली अविश्वासाची दरी कशी वाढत गेली याचे वर्णन या तीन टप्प्यांवर केलेले आहे. याचाच परिणाम म्हणजे, १९६२ च्या युद्धानंतर या दोन देशांमधले संबंध त्यांच्या नीचांकी पातळीवर पोचलेले आहेत. हे दोन देश सतत शस्त्र बाळगून एकमेकांसमोर उभे राहिले, तर कदाचित टोकाच्या परिस्थितीत त्याचा परिणाम म्हणून सशस्त्र सामनाही होऊ शकतो. पण, दोन्ही देशांनी आपसांतल्या संबंधामध्ये जो अविश्वास आहे, त्याकडे समजून उमजून लक्ष दिले आणि एकमेकांच्या आंतरराष्ट्रीय स्थानाबद्दल दोन्ही देशांची जाणीवपूर्वक समजून घेतले, तर चीन-भारत शत्रुत्वात थोड्या प्रमाणात का होईना, पण सहकार्यदेखील नांदू शकेल. या संदर्भाने चीनने हे समजून घ्यायला हवे, की अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय स्थानाला धक्का लावण्याची त्याच्या सत्तेची आकांक्षा असेल, तर त्याआधी चीनने भारताबरोबर सामंजस्य ठेवण्यासाठी प्रथम पाऊल उचलायला हवे. अर्थातच ही प्रक्रिया सुलभ नसेल कारण आजवरच्या चीन-भारत संबंधांची जी वैशिष्ट्ये होती, त्यापासून त्याला आता संपूर्ण फारकत घ्यावी लागेल.

## विषय प्रवेश

१५ जून, २०२० या दिवशी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (LAC) हिंसक झटापट झाली ज्यात वीस भारतीय सैनिकांचा आणि नक्की आकडा समजू न शकलेल्या चिनी सैनिकांचा मृत्यू झाला. आशिया खंडातल्या सगळ्यात मोठ्या दोन भूभागांमधल्या सत्तर वर्षांच्या संबंधाना या घटनेमुळे एक वेगळेच वळण मिळाले आहे.[1] दोन्ही बाजूचे अभ्यासकही या मताला पुष्टी देतात. भारत-चीन संबंधांचा हा कदाचित "कडेलोटाचा क्षण" असू शकतो[2], असं मत ब्रह्मा चेल्लानी यांनी व्यक्त केलेले आहे, तर "१९६२ च्या सीमायुद्धानंतर उद्भवलेली सगळ्यात नीचांकी पातळीची परिस्थिती", असं वर्णन हु शिशेंग यांनी केले आहे[3]. या परिस्थितीला समोरची बाजू जबाबदार आहे असे दोन्ही देशांना वाटत आहे. देशाचे भूतपूर्व सुरक्षा सल्लागार शिवशंकर मेनन हे लडाखमध्ये जे काही झाले त्याचे वर्णन "[चीनच्या] वागणुकीत झालेला कायमस्वरूपी आणि तदनुषंगिक बदल" अशा शब्दांत करतात, तर हु यांचा दावा आहे, की खरं तर भारताच्या सरकारने "चीनप्रती कठोर पावले उचलायला सुरूवात केलेली आहे."[4] चीनने पूर्व लडाखच्या नियंत्रण रेषेलगत जी कृती केलेली आहे, त्यामुळे भारताच्या दृष्टीने, दोन्ही बाजूंनी १९९३ पासून सीमेच्या व्यवस्थापनासाठी जो आराखडा तयार केलेला होता, त्यालाच हानी पोचलेली आहे आणि त्यामुळे भारत-चीन संबंधांवर गंभीर दुष्परिणाम झालेला आहे.[5] गैरसमजुतींत भरच पडत आहे आणि परस्परांबाबत असलेला अविश्वास हा या बेबनावाच्या केंद्रस्थानी आहे. हे संबंध बिघडवत नेणारी कारणे काय होती हे समजून घेण्यासाठी या लेखात भारत आणि चीन यांच्यामधल्या सतत बदलत राहिलेल्या संबंधांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

हा लेख हे मांडू पहात आहे, की या दोन देशांचा एकमेकांबद्दलचा अविश्वास बळावत जाण्याचे कारण असे, की वैश्विक संदर्भांच्या पातळीवरून पाहता, या दोन देशांचे एकमेकांबद्दल गैरसमज आहेत आणि त्याच वेळी परस्परांबद्दल अपेक्षाही आहेत. दोन्ही देश स्वत:ला सांस्कृतिक सत्ता समजतात आणि समोरच्या देशाने हे सत्य कबूल करावे अशी अपेक्षा ठेवतात. गैरसमज निर्माण होतात, कारण एक देश दुसऱ्या देशाच्या कृतीला किंवा वागणुकीला एखादा हेतू चिकटवतो. वास्तविक, दुसऱ्या देशाचा तसा कोणताही हेतू नसू शकतो; पण त्यामुळे अविश्वास निर्माण होतो. त्यामुळेच मग, पुढची पावले टाकण्याआधी, दोन्ही बाजूंना आधी एकमेकांकडे बघण्याच्या दृष्टीकोनाची पुनर्बांधणी करावी लागेल. शिवाय, एकमेकांना भेडसावणाऱ्या एकेक मुद्द्याचे निराकरण करण्याआधी, एक नवीन दृष्टीकोन निर्माण करावा लागेल. हे विश्लेषण करताना भारतीय आणि चिनी अभ्यासकांनी मांडलेली मते प्रामुख्याने विचारात घेतलेली आहेत. पाश्चिमात्य स्रोतांना मुद्दामच वगळले आहे (जिथे एखादे लेखन भारतीय सह-लेखकाबरोबर केलेले आहे, अशा लेखांबाबत अपवाद केलेला आहे). भारत-चीन संबंधांकडे बघण्याचा खुद्द या दोन देशांचा दृष्टीकोन काय आहे, हे समजून घेणे, हे या लेखाचे उद्दिष्ट आहे.

या सर्व प्रकरणाकडे हा लेख तीन भिंगांतून बघतो. पहिले म्हणजे, २००८ पासून भारत आणि चीन यांनी परराष्ट्र धोरणांमध्ये जे बदल केले आणि भारत आणि चीन या दोन घटकांचीच त्या बदलांमध्ये किती व्याप्ती होती याचे विश्लेषण करणे. दुसरे म्हणजे, एका बाजूचे दुसऱ्या बाजूबद्दल जे समज आहेत आणि या प्रक्रियेमध्ये विद्यमान सरकारचा असलेला हात यांचे विश्लेषण करणे. इन्डो-पॅसिफिक या प्रदेशात भारत, चीन आणि अमेरिका यांच्यामध्ये नव्याने सुरू झालेली स्पर्धा हे या लेखातले तिसरे आणि शेवटचे भिंग आहे. चीनने पाकिस्तानशी वाढवलेले सौहार्द्र अशासारख्या आणखीही काही भिंगातून हे संबंध तपासता येऊ शकतील. पण जुने मुद्दे आत्ता थोडे कमी महत्त्वाचे आहेत असे दिसते. दोन्ही देशांची एकमेकांच्या भौगोलिक आणि राजकीय महत्त्वाकांक्षांबद्दल काय धारणा आहे, यातून काही अवघड विषय निर्माण होत आहेत, असे दिसते.

## भारत-चीन संबंधांची थोडक्यात पार्श्वभूमी

राजीव गांधी यांनी डिसेंबर, १९९८ मध्ये चीनला भेट दिली आणि भारत-चीन संबंधांच्या नवीन पर्वाची सुरूवात झाली. त्यामुळे धोरणांमध्ये मुळापासून बदल झाले. सर्वप्रथम, भारत आणि चीन दोघांचेही यावर एकमत झाले, की हे संबंध संपूर्णत: पूर्ववत केले जातील आणि सीमानिश्चितीचा जो प्रश्न आहे त्याचा आधी समेट व्हावा या अटीवर हे संबंध अवलंबून नसतील. दुसरे म्हणजे, जोपर्यंत सीमावादावर दोन्ही बाजूंना स्वीकारार्ह होईल असा योग्य आणि वाजवी अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत दोन्ही बाजू नियंत्रण रेषेवर शांतता आणि सलोखा ठेवतील. तिसरे म्हणजे, वैश्विक

शांतता राखण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी दोन्ही देशांनी जे भरीव योगदान दिलेले आहे, त्याची सुयोग्य पोचपावतीही दोन्ही बाजूंनी एकमेकांना दिली.[6] भारतीय वर्तुळात या भेटीचे वर्णन राजीव गांधी- डेंग शाओपिंग यांनी केलेली तडजोड असे केले जाते (मोडस व्हिवेंडी).

१९८० च्या दशकाच्या सुरूवातीलाच भारत बीजिंगबरोबर संबंध सुधारता येतील का याची पडताळणी करण्यासाठी गुप्तपणे पावले उचलायला लागला होता.[7] पण १९८० च्या उत्तरार्धात काही नवीन परिस्थितींचा सामना करावा लागला. त्यापैकी एक होता १९८६-८७ मध्ये नियंत्रण रेषेवर सुमडोरोंग चु खोऱ्यात चीनच्या लष्कराशी समोरासमोर झालेला सामना (यालाच वांगडुंग घटना असेही म्हणतात).[8] त्यानंतर फेब्रुवारी, १९८७ मध्ये भारताने तिच्या इशान्येकडे असलेल्या अरुणाचल प्रदेश या भूभागाला स्वतंत्र राज्याचा दर्जा दिल्यानंतर भारत आणि चीनमधला वाद चिघळल[9]. त्यानंतर, रशियाचे भूतपूर्व अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव यांच्या नेतृत्वाखाली चीन-रशिया संबंध पूर्ववत करण्याचे घाटले जात होते, ज्यानेही वादात आणखी ठिणगी पडली. दुसरीकडे चीनचे पश्चिमेबरोबरही संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू झालेले होते.[10] असेही वर्तवले गेले, की १९८९ मध्ये येऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुका आणि बोफोर्स तोफांच्या व्यवहारात झालेले लाचखोरीचे आरोप यांमुळेही भारताला आपले परराष्ट्र धोरण यशस्वी करणे आवश्यकच होते[11]

भारताचा असा समज होता, की चीनचे भूतपूर्व सर्वोच्च नेते डेंग शाओपिंग यांच्या रूपात चीनला एक स्थिर आणि व्यावहारिक नेतृत्त्व लाभलेले आहे. डेंग शाओपिंग यांनी भारताचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री आणि पुढे देशाचे पंतप्रधान झालेल्या अटल बिहारी वाजपेयींशी आणि भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी संपर्क साधला होता.[12] याचा अर्थ असा, की चीन एका वास्तववादी पायावर नियंत्रण रेषेच्या वादावर तोडगा काढण्यासाठी अधिक अनुकूल असेल, एकमेकांवर विश्वास आहे असे दाखवणारी पावले उचलून कायमस्वरूपी शांतता आणि सलोखा राखण्यासाठी तयार असेल, भारताच्या प्रादेशिक अखंडत्वाप्रती आणखी आदर आणि सन्मान दाखवेल आणि भारत-चीन संबंधांमध्ये सुधारणा घडवून त्यायोगे चीन-पाकिस्तान संबंध आटोक्यात ठेवेल अशी भारताची अपेक्षा होती[13] ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी भारताने चीनबरोबर अनेक पद्धतींनी देवाणघेवाण सुरू केली. यात वल्गना कमी करणे, शिखर पातळीवरच्या बैठकी आणि इतर राजनैतिक बैठका पुनर्स्थापित करणे, व्यापार आणि व्यवहार परत सुरू करणे, सामान्य लोकांना एकमेकांशी संपर्क ठेवण्यावरची बंधने शिथिल करणे, सीमेवर असलेल्या प्रदेशांमध्ये विश्वास बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे, दोन्ही लष्करांमधले संबंध पूर्ववत करणे आणि अनेक पातळ्यांवर एकमेकांशी सहकार्य वाढवणे अशा प्रयत्नांचा समावेश होता.

या नंतरच्या काही वर्षांमध्ये भारताच्या दृष्टीने याचे सकारात्मक किंवा फायदेशीर परिणाम झाले. यांत नेत्यांच्या पातळीवर पुनर्स्थापित झालेला संवाद, सिक्किम हा भारताचा भाग आहे याला चीनने अधिकृतपणे दिलेली मान्यता, १९९३ आणि १९९६ मध्ये झालेले शांतता आणि सलोखा कायम ठेवण्यासंबंधीचे करार, २००५ मध्ये पॉलिटिकल पॅरमीटर्स ऍन्ड गायडिंग प्रिन्सिपल्स फॉर द सेटलमेंट ऑफ द इंडिया-चायना बाउंड्री क्वेश्चनचा करार, भारताचा इशान्य भाग आणि त्याच्या आसपासच्या भागात कार्यरत असणाऱ्या बंडखोर गटांना कमी मदत करणे आणि व्यापारात वृद्धी करणे यांचा समावेश होता.[14] पण, वास्तवाच्या आधारावर सीमावादावर तोडगा काढण्यासाठी चीन तयार नव्हता. २००३ मध्ये चीनने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेबद्दल स्पष्टीकरण देणारे प्रयास थांबवले; २००० सालानंतर नियंत्रण रेषेलगत आणि तिबेटमध्ये त्याने वेगाने पायाभूत सुविधांचे जे बांधकाम केले, त्यामुळे चिंता वाढली; जम्मू आणि काश्मिरच्या मुद्द्यावर स्वत:च्या दृष्टीकोनात चीनने कोणताही साधासा बदल केला नाही; आणि पाकिस्तानला प्राणघातक शस्त्रांचा पुरवठा त्याने अखंड सुरूच ठेवला.[15] २००० सालाच्या मध्यापर्यंत व्यापारातही मोठ्या प्रमाणावर असमतोल निर्माण झालेला होता, ज्यामुळे अडचणींत वाढच झाली.

चीनने असे गृहित धरले असावे, की पूर्वेकडे असलेल्या प्रदेशात तो स्वत:च्या अटींवर सीमावादावर तोडगा काढू शकेल, (नेपाळने केले, त्याचप्रमाणे) भारत तिबेटी विस्थापितांच्या हालचालींवर हळूहळू पण निश्चितपणे मोठ्या प्रमाणावर प्रतिबंध करेल, भारतीय बाजारपेठ चिनी मालासाठी खुली असेल, चीनच्या नैऋत्य सीमेच्या सुरक्षिततेबाबत भारत संवेदनशीलता दाखवेल आणि अनेक पातळ्यांवर भारत चीनला आपले समर्थन देईल, भारत-पाकिस्तान संबंध चीन निश्चितपणे विभक्त करू शकेल आणि दक्षिण आशियातल्या इतर देशांबरोबर सोप्या अटींवर संबंध ठेवू शकेल.[16] नियंत्रण रेषेच्या बाजूने शांतता आणि सलोखा नांदत असल्याने चीनला सुरक्षिततेबद्दल आश्वस्त वाटत गेले आणि भारताकडून फार गंभीर आक्षेप न

आल्यामुळे त्याने तिथे पायाभूत सुविधा उभ्या केल्या, भारतीय बाजारपेठ खुली झाली, चीन भारताचा सगळ्यात मोठा व्यापारविषयक भागीदार झाला; तिबेट हा पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाचा भाग आहे याबाबत भारताकडून मान्यता मिळवण्यामध्ये बरीच प्रगती साध्य करता आली; आणि शस्त्रास्त्र विक्री करण्याच्या मार्गाने चीनने दक्षिण आशियातदेखील बऱ्यापैकी खोलवर शिरकाव केला.[17] सीमावादाच्या प्रश्नावर चटकन तोडगा निघू शकेल अशी चीन सरकारची अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही; तिबेटच्या प्रश्नाबद्दल त्याच्या खूपच जास्त अपेक्षा होत्या, त्याही कदाचित पूर्णपणे पूर्ण होऊ शकल्या नाहीत; त्याला असे वाटले, की चीनकडून भारताला धोका आहे अशी भारतात एक धारणा आहे आणि तिला अधिकृत बळ मिळत आहे; आणि २००८ नंतर भारताची अमेरिकेबरोबरच्या संबंधांची जी पुनर्बांधणी झालेली आहे तो एक चिंतेचा विषय आहे.

१९९० च्या मध्यात चीनचे भारतातले राजदूत चेंग रुईशेंग यांनी या संबंधांचे वर्णन असे केले आहे : "संबंधांमध्ये लक्षणीय सुधारणा झालेली असूनही पुरेशी विश्वासार्हता अजूनही नाही.[18] मोडस व्हिवेंडीनंतर दोन दशके उलटल्यानंतर चीन भारताबद्दल कसा विचार करतो याबाबत दोन धारा दिसतात- एक धारा असे समजते, की भारताच्या आर्थिक, वैज्ञानिक आणि लष्करी क्षमतांमध्येदेखील वाढ होत आहे, पण अर्थातच चीनच्या वेगाने नाही[19] दुसऱ्या बाजूला, भारत एक महत्त्वाची सत्ता आहे या दाव्याला अनेक चिनी नेत्यांनी झटकून टाकले; हा दावा अवास्तववादी आणि खोटा आहे असे त्यांनी दिलेले कारण होत.[20] दोन्ही देश एकमेकांच्या यशाबद्दल आनंद आणि चिंता अशा परस्परविरोधी भावना बाळगून होते, एकमेकांच्या महत्त्वाकांक्षांबद्दल सावध होते पण त्याच्याच बरोबरीने एकमेकांप्रती आदर राखून हे भानही ठेवून होते, की नवीन शतकामध्ये इतर जगाच्या तुलनेत या दोन देशांची प्रगती अधिक होईल. दोन्ही देशांच्या व्यापक राष्ट्रीय ताकदीमध्ये पडत चाललेल्या अंतराचा विचार करता, मोडस व्हिवेंडीचे पालन करणे तसेही अवघड होत चालले होते, पण अविश्वासाची तलवार परस्परसंबंधांवर टांगलेली असूनही दोन्ही बाजूचे बहुतांश विश्लेषक भविष्यकाळाबद्दल उदासीन मात्र वाटत नव्हते.[21]

## चीन आणि भारताची बदलती परराष्ट्र धोरणे

१९९० च्या दशकात भारत आणि चीन हे दोन्ही देश आर्थिक वाढीचे साक्षीदार झाले. याचाच परिणाम म्हणून एकविसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच त्या दोघांनीही आपला प्रभाव वाढवायला सुरूवात केली आणि त्यांच्या बदलत्या परराष्ट्र धोरणांत त्याचे प्रतिबिंब दिसायला लागले. परराष्ट्र धोरणाची फेरआखणी करण्याच्या या प्रक्रियेचा परिणाम भारत-चीन संबंधांच्या भविष्यावर होईल का?

### चीनची बदलती परराष्ट्र धोरणे

वांग जिसी आणि यान शुएटोंग या अभ्यासकांचा असा दावा आहे, की २००८-०९ च्या दरम्यान स्थानिक पातळीवर आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे डेंग यांच्या टाओ गुआंग यांग हुई, म्हणजेच "मान खाली ठेवा आणि वेळकाढूपणा करा" या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार करायची गरज निर्माण झाली.[22] चीनची अर्थव्यवस्था आणि त्यामुळे त्याची एकूण राष्ट्रीय ताकद मोठ्या प्रमाणावर वाढलेली होतीच, पण बाजारपेठा आणि संसाधनांना गवसणी घालायचा चीनचा आवाकाही खूप विस्तारल्यामुळे जागतिक घटनांमध्ये अधिकाधिक सहभागी होण्यासाठीचा त्याच्यावरचा दबावही वाढत होता.[23] चीनमध्ये जवळपास सगळेच जण हे मान्य करतात, की जागतिक स्तरावरच्या आर्थिक मंदीमुळे पाश्चिमात्य देशांचा कमकुवतपणा उघडा पडला आणि चीनच्या वाढीचा रस्ता मोकळा झाला.[24] तत्कालीन अमेरिकन अध्यक्ष बराक ओबामा यांचे आशियाच्या दिशेने झुकलेले धोरण, चीनचे दक्षिण चिनी समुद्रात व्हिएतनाम आणि फिलिपिन्सबरोबर असलेले वाद, चीनचा जपानशी सेनकाकू (किंवा डेओयू) बेटांवरून असलेला वाद या कारणांमुळेदेखील परराष्ट्र धोरणाचा आढावा घेऊन त्यात योग्य ते बदल करणे अगत्याचे होते.[25] टाओ गुआंग यांग हुई या धोरणात अधिककरून "करू शकतो" पद्धतीचे मुद्दे होते. चीनचे काही अभ्यासक या धोरणाचे वर्णन "टाओ गुआंग यांग हुईवर जोर देताना प्रत्यक्षात दुसरेच काहीतरी करत राहणे हे बिजिंगच्या दृष्टीने तर्कसुसंगत नव्हते", असे करतात.[26] यान यांच्या मते, डेंग यांच्या टाओ गुआंग यांग हुई हे धोरण चीनला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे आणि सांस्कृतिक क्रांतीमुळे जो वेळ वाया गेला तो भरून काढणे यासाठी आखले गेलेले होते. आर्थिक समृद्धी मिळवणे या मुख्य उद्दिष्टासाठी चीनला त्याची दीर्घकालीन स्वारस्ये बाजूला ठेवणे क्रमप्राप्त होते. चीनने कोणतेही नेतृत्वपद घेणे टाळले होते

आणि परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट बाजूला ठेवून त्याने त्याऐवजी अमेरिकेबरोबर असलेल्या त्याच्या संबंधांना प्राधान्य दिले होते.[27] चीनला एकेक देशाप्रमाणे परराष्ट्र धोरण आखणे याच धोरणापासून फारकत घेऊन आता मुद्दे आधारित परराष्ट्र धोरण आखणे आवश्यक झालेले होते. याचाच अर्थ असा, की धोरण म्हणून तो जागतिक स्तरावरच्या घडामोडींमध्ये फारसा सहभाग घेत नव्हता; ते बदलून आता जागतिक वातावरणाची आखणी करण्यासाठी त्याने पुढे होऊन सहभाग नोंदवणे गरजेचे झालेले होते.[28] हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी चीनने आपल्या परराष्ट्र धोरणात नवीन तत्त्वांचा स्वीकार केला.[29]

चीनच्या बदललेल्या दृष्टीकोनाचे वर्णन फेन फा यु वेई, म्हणजेच "यशप्राप्तीसाठी कष्ट करणे" असे करता येईल. परस्पर विश्वासाच्या आधारावर संबंधांची पायाभरणी करणे हे आत्तापर्यंतच्या चीनच्या परराष्ट्र धोरणाच्या केंद्रस्थानी होते. हे बदलून आता दोन्ही बाजूंच्या हितसंबंधांवर आधारित संबंध स्थापित करणारे धोरण आखावे असे सुचवण्यात आले. शिवाय, आधीच्या काळात आपल्या परराष्ट्र धोरणात चीन अमेरिकेला सर्वोच्च महत्त्वाचे स्थान देत होता.[30] त्याच्या तुलनेत आता आपल्या शेजारी देशांनाही त्याने समान प्राधान्य द्यावे असेही सुचवण्यात आले. बौद्धिक पातळीवर हे जे मंथन झाले त्याचे परिणाम शी अध्यक्ष झाल्यावर उघडपणे दिसले. ऑक्टोबर २०१३ मध्ये शी यांनी शेजारी देशांबरोबर एका परराष्ट्रसंबंधविषयक परिषदेचे आयोजन केले. त्यांनी अशा घोषणा केली, की

> शेजारी देशांबरोबर परराष्ट्र धोरणविषयक चांगले काम करायला हवे कारण 'दोन शतकी' उद्दिष्ट पूर्ण करायची असतील आणि संपूर्ण चीन देशाचा मोठ्या प्रमाणावर कायाकल्प करायचा असेल, तर हे आवश्यकच आहे. शेजारी देशांबरोबर प्रगत पातळीवर परराष्ट्र संबंध ठेवण्यासाठी, चीनच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरणनिर्मिती करण्यासाठी आणि चीनच्या विकासातून शेजारी देशांनाही फायदा मिळावा आणि एकूणच सर्वांची समान प्रगती व्हावी यासाठी चीनला कष्टपूर्वक प्रयत्न करावे लागतील.[31]

चीनची आजपर्यंतची मार्गदर्शक तत्त्वे आणि परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे यात मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत याचे द्योतक म्हणजे हे भाषण होते.[32] यान यांनी लिहिले आहे, की फेन फा यु वेई हे धोरण आता पैसे मिळवण्याबद्दल राहिलेले नव्हते; मित्र बनवणे, शेजारी देशांसाठी नेतृत्वाचे उदाहरण म्हणून उभे राहणे आणि परस्पर हितसंबंध जोपासण्यासाठी धोरणात्मक विश्वासार्हता जपणे अशी या धोरणाची पुनर्रचना चीनने केली होती. चीनला मिळणारे आर्थिक फायदे इतरांबरोबर वाटून घेणे आणि चीनच्या विस्तारामुळे आजूबाजूच्या घटकांचा विकास होऊ देणे हेही त्यात अंतर्भूत होते.[33]

पण, अमेरिकेबरोबर चीन कसे संबंध ठेवणार हा चीनच्या परराष्ट्र धोरणासमोरचा मुख्य प्रश्न होता.[34] अमेरिकेच्या सेक्रेटरी ऑफ स्टेट, हिलरी क्लिंटन यांनी असे वक्तव्य केले होते, की एक धोरणात्मक उद्दिष्ट मनात ठेवून अमेरिकेचा लंबक आशियाच्या दिशेने झुकलेला आहे. बिजिंगने या वाक्याचा असा अर्थ घेतला, की एशिया-पॅसिफिक प्रदेशात चीनला भौगोलिक समानता मिळू नये यासाठी अमेरिकेने हे धोरण निश्चित केलेले आहे.[35] या प्रदेशात अमेरिकेने ज्या हालचाली केल्या त्यावर चीनने मोठी चिंता व्यक्त केली. अमेरिकेचे भागीदार देश आणि त्याचबरोबर तो भारतासहित जे नवीन संबंध विकसित करत होता, त्यामुळे चीनला एकटे पाडले जात आहे अशी त्याची भावना बळावली[36] काही चिनी विश्लेषकांचे हे मत आहे, की याच कारणामुळे चीन त्याच्या आजूबाजूला असलेल्या स्थानिक वातावरणाला आकार देण्यासाठी पुढाकार घेऊ लागला आणि बचावात्मक अथवा सकारात्मक अशा कोणत्याही मार्गाने अधिकाधिक प्रकारे मुसंडी मारू लागला.[37]

असाही प्रश्न आहे, की आपल्या परराष्ट्र धोरणाची फेरआखणी करत असताना भारत या घटकाचा चीनने विचार केला का, आणि केला असल्यास, त्याला किती महत्त्व दिले? चीन भारताकडे कोणत्या दृष्टीकोनातून, कशा पद्धतीने बघतो हेही यातून समजते. एक महत्त्वाचा शेजारी आणि एक विकसित होणारा देश असे भारत देशाचे वर्णन चीनच्या संशोधनामध्ये वेळोवेळी करण्यात आलेले आहे. अनेक पातळ्यांवरच्या विविध घडामोडींमध्ये या दोन्ही देशांचे हितसंबंध एकाच प्रकारचे होते आणि दोन्ही देश साधारण एकाच वेळेला विकसित होत गेले याकडे चिनी अभ्यासक लक्ष वेधतात.[38] हवामानातील बदल, रशिया-भारत-चीन हा त्रिकोण आणि (ब्राझिल आणि दक्षिण आफ्रिकेचा समावेश असलेला) ब्रिक्स गट अशा जागतिक पातळीवरच्या काही मुद्द्यांवर भारत आणि चीन एकत्रितपणे काम करत आहेत असेही दिसत होते. भारत आणि चीन यांच्यामध्ये धोरणात्मक पातळीवर विरोधाभास नाहीये याचाही संदर्भ काही चिनी अभ्यासक देतात; पण काही द्विपक्षीय मुद्द्यांवर गंभीर मतभेद आहेत हेही मान्य केले गेलेले

आहे.[39] तरीही, एका नवीन दिशेने जाऊ पाहणाऱ्या चीनच्या परराष्ट्र धोरणाबद्दल बरेच वादविवाद होत असताना भारताचा संदर्भ अपवादानेच आलेला दिसतो. कोणत्याही काळातल्या चिनी लेखांमध्ये अमेरिका, चीन आणि रशिया यांचाच ताकदवान देश म्हणून नेहेमी उल्लेख झालेला आहे. यात वेळोवेळी संदर्भांसाठी जपान आणि युरोपियन युनियनचाही उल्लेख झालेला आहे, पण भारताचे नाव क्वचितच घेतले गेलेले आहे.[40] कदाचित जागतिक धोरण आखण्याच्या विस्तारित चित्रामध्ये भारत हा देश एक धोरणात्मक चिंतेची बाब आहे असे चीनला वाटले नसावे. आणि, चिनी विदेशी धोरणासमोर अमेरिकेच्या रूपाने जे धोरणात्मक आव्हान उभे आहे, ते हाताळताना भारत हा एक महत्त्वाचा भागीदार होऊ शकतो असा विचारदेखील चीनने केलेला नाही. कदाचित चीनने असा निष्कर्ष काढला असावा, की संपूर्ण जगात एक सत्ता म्हणून उदय होताना चीनला मदत करण्याची, अथवा चीनच्या प्रयत्नांत खीळ घालायची क्षमता भारताकडे नसावी. यामुळे ही गोष्टदेखील स्पष्ट होते, की चीनच्या लगतचा एखादा मुद्दा असेल किंवा जेव्हा दोन्ही देशांना एकत्रितपणे विकसनशील देश आणि उगवत्या आर्थिक सत्ता अशा वेगवेगळ्या पातळींवर उद्देशून काही भाष्य केले गेले असेल, तरच चीन भारताचे महत्त्व लक्षात घेत होता.[41] बीजिंगने असेही गृहित धरले असावे, की त्याच्या वैश्विक महत्त्वाकांक्षांना भारताचा काहीही गंभीर आक्षेप नसेल आणि जे काही दोन देशांतील वैयक्तिक मुद्दे असतील ते द्विपक्षीय चर्चेद्वारे सोडवले जाऊ शकतील.

चीन भारताला मित्र देश समजत नव्हता, की त्याच्या वाढीच्या आड येणारा देश असेही समजत नव्हता. तरीदेखील, "कष्टपूर्वक प्रयत्नां"चा अंतर्भाव असलेल्या त्याच्या परराष्ट्र धोरणाचा भारतावर मोठा परिणाम होणार होता. सामायिक हितसंबंध असलेल्या मुद्द्यांवर चीनला आपल्या आर्थिक प्रगतीचे फायदे शेजारी देशांना द्यायचे होते आणि त्यातून धोरणात्मक विश्वासार्हता निर्माण करायची होती. याचा परिणाम म्हणून चीनने बेल्ट ॲन्ड रोड इनिशिएटिव्ह (BRI) ची स्थापना केली, ज्यामुळे भारताच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला एक घटक आणि भारताला भेडसावणारा एक अतिशय संवेदनशील मुद्दा आणि यांना धक्का लागला. दक्षिण आशियात असलेला भारताचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक प्रभाव हा यातला महत्त्वाचा घटक होता आणि जम्मू आणि काश्मिर हा भारताचा सार्वभौमिक भाग होता हा यातला संवेदनशील मुद्दा होता.[42] BRI बाबत चीनने भारताशी कसलीही सल्लामसलत केली नाही. चीनने हे गृहित धरले असावे, की भारताला त्याच्या योजना मान्य असतील आणि भारत BRI ला अनुसरूनच स्वत:च्या योजना आखेल.[43] पुढे जाऊन जेव्हा चीन पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर (CPEC) च्या महत्त्वाच्या प्रकल्पाची घोषणा चीनने केली, तेव्हा भारताला त्याच्या BRI शी संलग्न राहणे कठिण जायला लागले. दुसरे म्हणजे, दक्षिण चिनी समुद्रात चिनी सत्ता मुसंडी मारायला लागली आणि त्याचबरोबर चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने (PLA) प्रत्यक्ष नियंत्रण रेषे (LAC) जवळच्या डेपसांग (२०१३) आणि चुमर (२०१४) या भागात नव्याने बंडखोरी सुरू केली. यांमुळे भारताच्या चिंता वाढल्या.[44] अखेरीस, अमेरिकेच्या इंडो-पॅसिफिक धोरणाबद्दल चीनला जी भीती वाटत होती त्याचे सावट भारत-चीन संबंधांवर पडायला लागलेच. भारताच्या दृष्टिकोनातून पाहिले, तर चीनचा असा आविर्भाव होता, की भारताने या बाबतीत चीनच्या चिंतांना समर्थन द्यायलाच हवे; पण, त्याचबरोबर भारताला चिंता वाटणाऱ्या मुद्द्यांबाबत चीन स्वत: मात्र पूर्णत: अलिप्त राहत होता. भारतावर परिणाम होणाऱ्या चीनच्या नवीन परराष्ट्र धोरणातल्या स्थानिक आणि विविध पातळीवरच्या मुद्द्यांवर जेव्हा जेव्हा भारताने प्रतिक्रिया दिली, तेव्हा तेव्हा बीजिंगला त्याचा त्रास झाला आणि तिथे अस्वस्थता पसरली. चीनच्या नेत्यांचे असे मत होते, की भारताच्या संवेदनशील मुद्द्यांना धक्का लागेल असे त्यांनी काही केलेलेच नव्हते, पण भारत मात्र अशा पद्धतीने प्रतिक्रिया देत होता ज्यामुळे चीनच्या संवेदनशील मुद्द्यांना धक्का लागू शकत होता.

## भारताची बदलती परराष्ट्र धोरणे

भारतीय अभ्यासकांचे साधारणपणे यावर एकमत आहे, की चीनचे स्वत:च्या परराष्ट्र धोरणाची फेररचना केली, त्याच्या किमान एक दशक आधी भारत सरकारने आपल्या परराष्ट्र धोरणाचा फेराआढावा घेण्याची सुरूवात केलेली होती.[45] कोणाबरोबरही एकत्र न जाण्याचे, म्हणजेच सर्वांपासूनच समान अंतरावर राहण्याचे भारताचे धोरण १९९० च्या उत्तरार्धापर्यंत कालबाह्य झालेले होत.[46] भारताचे मात्र चीनप्रमाणे मुद्दामून, समजून उमजून एखादे एकत्रीकरणाचे धोरण किंवा एखादे भव्य धोरण आखण्याचे बेत नव्हते. उलट, आपल्या अनुभवांआधारे त्याने नवीन धोरणात अनेक नवनवीन घटकांचा समावेश केला. वाजपेयी सरकारने आण्विक बाजूचा समावेश केला, मनमोहन सिंगांच्या सरकारने अमेरिकेबरोबरच्या मैत्रीचा समावेश केला; आणि विद्यमान मोदी सरकारने सामरिक बाजूचा समावेश त्यात केलेला आहे. भूतकाळात ज्या पद्धतीची धोरणे आखली जात होती, त्यापासून फारकत घेणारे हे मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण आहे असे मत चीनच्या काही भागातून व्यक्त होत असले, तरी भारताच्या सर्व परराष्ट्र धोरणांमध्ये एक समान धागा सापडतो- आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थान निर्माण करणे आणि अनेक पातळ्यांवर समन्वय साधणे.[47]

पण, आपल्या परराष्ट्र धोरणांची पुनर्रचना करायला हवी याची जाणीव करून देणारी कारणे मात्र भारत आणि चीनसाठी वेगवेगळी होती. भारतासाठी चीन हा एक महत्त्वाचा घटक होता, तर चीनने नवीन मार्ग चोखाळताना भारताचा विचारदेखील केला नाही. एका पाठोपाठ आलेल्या भारताच्या प्रत्येक सरकारने दोन धाग्यांवर काम केले : अमेरिकेबरोबर धोरणात्मक संबंध निर्माण करणे आणि ते जोपासणे; आणि चीनबरोबर संबंध ठेवण्याच्या विविध पद्धती शोधून काढणे.[48] १९९१ नंतर भारताने सीमावादाचा प्रश्न सोडवण्यासाठी किंवा त्याची धार कमी करण्यासाठी उच्च पातळीवरून मनापासून प्रयत्न केले. त्यासाठी, LAC ठरवण्यासाठी संयुक्त प्रक्रिया सुरू करण्यात आली आणि न्याय्य, रास्त आणि दोन्ही बाजूंना मान्य असेल असा तोडगा शोधण्यासाठी राजनैतिक पातळीवरून नवीन, विशेष प्रतिनिधींची नेमणूक करण्यात आली. अनेकदा पीछेहाट होऊनदेखील सिंग यांच्या सरकारने चीनला चर्चांमध्ये गुंतवून ठेवले आणि एप्रिल २००५ मध्ये पॉलिटिकल पॅरमीटर्स ॲन्ड गायडिंग प्रिन्सिपल्स फॉर द सेटलमेंट ऑफ द इंडिया-चायना बाउंड्री क्वेश्चन हा करार घडवून आणला.[49] इंडिया-चायना स्ट्रॅटेजिक ॲन्ड कोऑपरेटिव्ह पार्टनरशिप फॉर पीस ॲन्ड प्रॉस्पेरिटीची स्थापना झाली तेव्हा त्यात याच वाढलेल्या आकांक्षेचे प्रतिबिंब पडलेले दिसले.[50] पण याचा अर्थ असा नाही की या संबंधांमधल्या तणावांचा विसर भारताला पडलेला होता. उलट ही अंतस्थ जाणीव कायम होती, की भारताचे चीनशी दीर्घकाळ शत्रुत्व सुरूच राहील, पण या शत्रुत्वाचा परिणाम म्हणून सहकार्याच्या महत्त्वाच्या घटकांना अटकाव करण्यात येणार नाही.[51]

भारताच्या दृष्टीने संबंधांमध्ये तुलनेने स्थैर्य निर्माण झालेले असताना, भारताने दिलेल्या सहकार्याच्या या हाकेला चीनने प्रतिसाद दिला का? भारतीय विश्लेषकांच्या एका लहान गटाचे असे मत आहे, की प्रतिसाद होता; पण मोदी सरकारने हे धोरण वाऱ्यावर सोडून दिले आणि अमेरिकेबरोबर स्वत:ला संलग्न करून घेतले, तोपर्यंतच हे सहकार्य टिकले.[52] पण बहुतांशांचे मत असे आहे, की १९९० च्या मध्यापासून ते २००० च्या मध्यापर्यंतच्या सर्वसाधारणपणे चांगल्या असलेल्या कालखंडातदेखील भारताला भेडसावणाऱ्या गंभीर मुद्द्यांप्रती बीजिंगने कधीही संवेदनशीलता दाखवली नाही. २००५ च्या करारानंतर एका वर्षाच्या आतच अरुणाचल प्रदेश या भूभागाचे नामकरण दक्षिण तिबेट करणे हे निश्चितच खोडसाळ होते. अरुणाचल प्रदेशामध्ये होणाऱ्या विकास प्रकल्पांसाठी विविध पातळीवरून कर्ज देणेही चीनने थांबवले. जम्मू आणि काश्मिरच्या रहिवाशांना साधे कागदी व्हिसा देण्याच्या कृतीतून हे सिद्ध झाले, की चीनला भारताच्या दाव्याचा किंचितदेखील सन्मान ठेवण्याची इच्छा नव्हती. नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या हल्ल्यानंतर काही महिन्यांनी युनायटेड नेशन्स सेक्युरिटी काउन्सिल १२६७ सँक्शन्स कमिटीने तयार केलेल्या दहशतवाद्यांच्या यादीवर चीनने हरकत उपस्थित केली आणि सामान्य नागरिकांसाठीदेखील महत्त्वाच्या असलेल्या मुद्द्यावर स्वत:ची असंवेदनशीलता दाखवून दिली. दक्षिण आशियात चीनचे पसरणारे हातपाय पाहून धोरण अभ्यासकांनीदेखील नापसंती व्यक्त केलेली आहे.[53] चर्चा सुरू ठेवण्याच्या प्रयत्नवादी धोरणांतून मिळणाऱ्या असमान फायद्यांवर २००९ च्या मध्यापासून जाहीर नाराजी व्यक्त व्हायला लागली. भारतीय सुरक्षा विश्लेषक चेल्लनी यांनी लगेचच यावर मत व्यक्त केले होते, की संबंधांमध्ये नवीन दऱ्या वाढायला लागलेल्या आहेत आणि त्यामुळे धोरणांमधल्या अंतस्थ विसंगती आणि शत्रुत्व उघडे पडायला लागले आहे. 'वेन शुई झु क्विन्वा' (बेडूक मारायचा असेल तर हळूहळू पाणी गरम करा) ही चिनी म्हण उद्धृत करत ते म्हणाले, की लंबक आपल्या फायद्याच्या बाजूने पूर्ण झुकेपर्यंत भारताला संशय येणार नाही अशा पद्धतीने हळूहळू कृती करत रहायच्या, असे चीनचे धोरण आहे.[54]

याच काळात आणखी एक दृष्टीकोन विकसित झाला : की चीन ही एकमेव मोठी सत्ता आहे जिने भारताच्या वाढीविषयी पूर्णपणे औदासिन्य दाखवलेले आहे.[55] चीन ही एक मोठी सत्ता आहे याची जाणीव भारताने मात्र पहिल्यापासूनच ठेवलेली आहे.[56] युनायटेड नेशन्स आणि वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायजेशन यांमध्ये चीनला सदस्यत्व मिळायला हवे यासाठी भारताने चीनला संपूर्ण पाठिंबा दिला होता.[57] अनेक भारतीय अभ्यासकांना असे वाटते की चीन, कमीतकमी उघडपणे तरी, भारत हेदेखील एक मोठे सत्ताकेंद्र आहे हे फार अभावाने मान्य करतो. पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाचे भूतपूर्व अध्यक्ष माओ झेडाँग हे भारताला भांडवलशाहीचा "चाकर" आणि भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना "साम्राज्यवादाशी हातमिळवणी करणारे" असे म्हणत असत.[58] भूतपूर्व सम्राट झोऊ एनलाय हेटाळणीने म्हणत असत, की भारत हा एक "तळ नसलेला खड्डा" आहे ज्याला तातडीने विदेशी आर्थिक मदतीची आवश्यकता आहे.[59] डेंग यांनी केलेल्या भारत, चीन आणि आशियाच्या शतकाविषयी केलेली अपवादात्मक विधाने वगळता, चिनी विदेशी धोरणाच्या पायाभरणीत हा दृष्टीकोन कायम राहिला आहे असे दिसते.[60] भारताच्या महासत्ता होणाच्या मार्गावर जातपात, गरिबी आणि स्थानिकवाद यांचा मोठा प्रभाव असणार आहे, असे चीनचे एकेकाळचे जुने मत आजही अनेकदा चिनी लेखांमध्ये डोके वर काढते.[61] १९९० नंतर भारतात जे काही बदल घडले त्यांना काहीही महत्त्व दिले जात नाही. याचे एक असेही कारण असू शकेल की

“सुधारणा आणि खुले वातावरण” यांचा स्वीकार केल्यानंतर चीनने आपले सगळे लक्ष पश्चिमेकडे वळवल्यामुळे भारताबद्दल त्यांचा पुरेसा अभ्यास झालेला नाही. शेन झिहुआ या चिनी ज्ञानाच्या अभावाबद्दल म्हणतात –

> मला असे वाटते, की व्हिएतनाम, मोंगोलिया, भारत यासारख्या शेजारी देशांबरोबर चीनचे संबंध अतिशय गुंतागुंतीचे आणि सतत बदलणारे आहेत. या संबंधांच्या इतिहासाचा तपास, त्यांचा अभ्यास फार कमी चिनी अभ्यासकांनी केलेला आहे. विद्वान आणि धोरणकर्ते यांना आपल्या शेजाराबद्दल फारच कमी माहिती आहे. धोरणकर्त्यांना आवश्यक त्या पार्श्वभूमीची माहिती अवगत करून न देण्यासाठी इतिहास लेखकांना जबाबदार धरायला हवे, असे माझे मत आहे.[62]

जेव्हा महत्त्वाच्या सत्तासंबंधांचा संदर्भ असतो, फक्त तेव्हाच चीन भारताकडे लक्ष देतो ही भावना प्रबळ होत जाते. माओ यांनी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्याशी बोलताना नोव्हेंबर १९७३ मध्ये केलेल्या विधानामुळे या भावनेला पुष्टीचमिळते : “भारताने स्वातंत्र्य मिळवलेले नाही. आता तो ग्रेट ब्रिटनबरोबर नाही, पण त्याने स्वत:ला सोव्हिएत युनियनसशी जोडून घेतलेले आहे.”[63] १९५० च्या दशकाच्या सुरुवातीला चिनी आणि सोव्हिएत नेत्यांच्या चर्चांमध्ये भारताच्या अमेरिकेबरोबर असलेल्या जवळिकीबद्दल अपरिहार्यपणे संदर्भ यायचा ; १९७० च्या दशकात चीन हेच अमेरिकेच्या नेतृत्वाला सांगायचा, पण त्यावेळेला सोव्हिएत युनियनबरोबर भारताच्या जवळिकीचा संदर्भ असायचा. पण वास्तविक पाहता, १९५० च्या दशकात खरे तर चीन सोव्हिएट्सच्या बाजूने झुकलेला होता आणि १९७० च्या दशकात दिशा बदलून तो स्वत:च दुसरीकडे झुकला होता.[64]

अशा रीतीने, दोन्ही देशांनी आपापल्या परराष्ट्र धोरणांना ज्या पद्धतीने आकार दिला त्याचा परिणाम सद्यस्थितीवरच्या मुद्द्यांवर होत आहे. चीन आणि भारत एकमेकांच्या परराष्ट्र धोरणांच्या महत्त्वाकांक्षांकडे ज्या पद्धतीने बघत आहेत त्यात दिवसेंदिवस असमानता वाढत आहे. भारताची भावना अशी आहे, की वैश्विक अथवा स्थानिक मुद्द्यांवर चीन भारताला पुरेसे महत्त्व देत नाही. या भावनेत भरच पडत आहे, कारण चीनने आपल्या परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करताना बेल्ट ॲन्ड रोड इनिशिएटिव्हसारखे प्रकल्प सुरू केले आहेत आणि हिंदी महासागरात मुसंडी मारलेली आहे. यांमुळे भारताला त्याचा थेट फटका बसायला लागलेला आहे.[65] त्यामुळे, स्वाभाविक प्रतिक्रिया म्हणून BRI किंवा दक्षिण चिनी समुद्र अशा संवेदनशील मुद्द्यांवरून भारताने चीनला मागे ढकलायचे प्रयत्न केलेले आहेत. भारताच्या या प्रयत्नांमुळे बीजिंगला धक्का बसला आहे असे दिसते. एका चिनी विश्लेषकाच्या मते : “नजीकच्या भूतकाळात चीन-भारत संबंधांतल्या सर्वच महत्त्वाच्या मुद्द्यांबद्दल चीनने चांगल्या मनाने सद्भावना दाखवलेली आहे, पण त्या बदल्यात त्याला तेवढ्या सदिच्छा मिळालेल्या नाहीत.”[66] चीनच्या दृष्टीने, त्याच्या परराष्ट्र धोरणात भारताला फारसे महत्त्व दिलेले नाही कारण भारत हे एक वैश्विक प्रभाव असणारे मोठे सत्ताकेंद्र आहे असे चीन मानत नाही. अनेक अभ्यासकांनी असे नोंदवलेले आहे, की मुख्यत्वे एक विकसनशील देश आणि एक शेजारी देश इतकाच प्राथमिक विचार चीन भारताबद्दल करतो.[67] याचाच अर्थ असा, की दोन्ही बाजूंनी जेव्हा आपापली परराष्ट्र धोरणे पुन्हा नव्याने आखली तेव्हा त्यांच्या एकमेकांबद्दलच्या समजुतीच चुकलेल्या होत्या. त्यामुळे पुढे दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेला परस्पर-अविश्वास आणि संशय यांची बीजे इथे सुरुवातीलाच पुरली गेलेली होती, २०१४ च्या मध्यात मोदींचे आगमन झाले, त्याही आधीपासून.

## चीन आणि भारताचे नवीन नेतृत्व

२०१४ च्या मध्यावर भारताने राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन करून मोदींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी (BJP) चे नवीन सरकार निवडून आणले. पंचवीस वर्षात पहिल्यांदाच कोणत्याही एकाच पक्षाला स्वत:च्या बळावर संसदेच्या खालच्या सभागृहात संपूर्ण बहुमत मिळालेले होते. भारत आणि चीनचे नवीन नेते- मोदी आणि शी सप्टेंबर, २०१४ च्या सुरुवातीलाच भेटलेले होते. मागच्या काही वर्षांत दोन्ही देशांमध्ये तणाव असला तरी चर्चा सुरू राहिली पाहिजे असे दोन्ही नेत्यांचे या भेटीत एकमत झालेले होते. पण २०२१ च्या सुरुवातीला हे संबंध संपुष्टात आल्यासारखे झाले आहेत. दोन्ही नेतृत्वांची कार्यपद्धती हेदेखील हे संबंध बिघडण्यामागचे एक कारण असू शकेल काय, याचा अभ्यास अभ्यासक करत आहेत. या दोन्ही नेवीन नेत्यांचा या संबंधांवर, झालाच असेल, तर काय परिणाम झाला?

## भारत आणि मोदी सरकार यांच्याबद्दल चीनचे मत

लिंग शेंगली यांच्यासारखे चिनी अभ्यासक नोंदवतात, की जेव्हा शी यांनी चीनच्या परराष्ट्र धोरणात शेजारी देशांना प्राधान्य दिले जाईल अशी घोषणा केली होती, तेव्हा चीनने स्थानिक सत्तेकडून वैश्विक सत्ताकेंद्र होण्यापर्यंतची झेप घ्यायची असे शी यांच्या मनात होते[68] शीतयुद्धाच्या उरलेल्या खुणा, भू-राजकीय दृष्टीने सीमांलगत तयार झालेले संवेदनशील भाग आणि (अमेरिकेसारख्या) बाह्य सत्तांची लुडबुड या कारणांमुळे आपल्या शेजारची परिस्थिती गुंतागुंतीची आहे याची जाणीव चीनला होती[69] त्यामुळे, लगतच्या प्रदेशात सामायिक सुरक्षेचे कवच उभारणे हे चीनचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते.[70] दक्षिण आशियात चीनला फारशी प्रगती करता आली नाही. चेंग रुइशेंग यांच्या मते, दक्षिण आशियाच्या इतर देशांमध्ये प्रत्येकाशी वेगवेगळे आणि समांतर संबंध विकसित करण्याच्या चीनच्या धोरणामुळे भारतात संदेह निर्माण व्हायला लागला.[71] चीनला पीछेहाट झाल्यासारखी वाटली, कारण चीन भारताच्या पारंपरिक प्रभाव मान्य करून त्याच्याशी समझोता करू इच्छित होता, पण स्थानिक सहभाग हा मुद्दा भारताला अजिबातच फायद्याचा दिसत नव्हता.[72] मोदी सरकार सत्तेत येण्याच्या बऱ्याच आधीपासून सर्वसामान्यपणे हा असा चीनचा दृष्टीकोन होता.

सप्टेंबर २०१४ मध्ये जेव्हा मोदी शी यांना भेटले, तेव्हा भारताला वाटणाऱ्या चिंतेचे मुद्दे थेटपणाने छेडणाऱ्या या नवीन पंतप्रधानांच्या कृतीमुळे नूतन दृष्टीकोन निर्माण झाला. एप्रिल २०१५ मध्ये जेव्हा मोदी उलट चीन भेटीला गेले तेव्हा गोष्टी चांगल्या जुळून येत आहेत अशी चिन्हे दिसत होती; पण शी यांनी चीन पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरला जे प्राधान्य दिले होते, त्याबद्दल भारताने नापसंती व्यक्त केली.[73] एका वर्षाच्या आत मोदी सरकारबद्दल चिनी धोरणकर्त्यांच्या समूहाने काही निष्कर्ष काढले. सुरुवातीचा अंदाज असा होता, की मोदींच्या नेतृत्वाखाली तयार झालेले परराष्ट्र धोरण "जोरकस" असेल.[74] चीनने जी धोरणात्मक मुसंडी मारलेली आहे त्याला प्रतिक्रिया म्हणून "शेजारधर्म सर्वप्रथम" या धोरणाअंतर्गत दक्षिण आशियात आर्थिक फायदे देऊन भारत आपले वर्चस्व पुनर्स्थापित करेल. त्यामुळे हाही निष्कर्ष काढला गेला, की चीनसाठी हे हानीकारक सिद्ध होईल.[75] चीनने दक्षिण आशियात मारलेली मुसंडी अजिबात फायद्याची नाही असा भारताचा दृष्टीकोन आहे, असे चीनला वाटत असल्यामुळे अशा पद्धतीचा निष्कर्ष त्यांच्या विचारांशी सुसंगतच होता.[76] भारताने हिंदी महासागरातच्या किनारपट्टीवर आपले लक्ष केंद्रित केले, त्याचीही नोंद चीनने घेतली; मोदी सरकारने पुढाकार घेऊन हिंदी महासागरात सागरी सुरक्षा साखळी निर्माण करायचे प्रयत्न केले अशा दृष्टीकोनातून त्याकडे पाहिले गेले. शिवाय, 'पूर्व दिशेकडे बघा' ('Look East'), याऐवजी धोरण बदलून आता 'पूर्वेच्या दिशेने काम करा' ('Act East') असे बदलले आहे आणि पॅसिफिक महासागराकडे भारताचा कल झुकला आहे, असाही अर्थ लावला गेला.[77] अंतिमत:, चीनने हे ठरवले, की मोदींच्या नेतृत्वाखाली भारत हेतूपुरस्सर अमेरिकेच्या बाजूने झुकत आहे. यातला न उच्चारलेला मुद्दा हा होता, की चीनला स्थानिक आणि जागतिक पातळीवरही शह देण्याचे मोदींचे धोरण आहे. तरीही, चिनी तज्ज्ञ असे गृहित धरत होते, की चीनने दक्षिण आशिया आणि हिंदी महासागरात जी मुसंडी मारली आहे त्याबाबत भारत धोरणात्मक पद्धतीला अनुसरून सावध पावले टाकत असला, तरी द्विपक्षीय आणि अनेक विविध पातळ्यांवर समन्वय साधण्यासाठी आणि सहकार्यासाठी भरपूर संधी आहे. भाजपाचे "उजव्या बाजूला झुकलेला राजकीय पक्ष" असे काहीसे कटू वर्णन चीनच्या कथनात मात्र डोकावायला लागले होते.[78]

हळूहळू, चिनी धोरणकर्त्या समूहाला वाटणारे संशय खालील बदलले आहेत. दोन भौगोलिक आणि राजकीय घडामोडींच्या आधारावर भारताचे वर्तन तपासले जात आहे- चीनचा BRI आणि अमेरिकेचे इन्डो-पॅसिफिक (हिंदी-प्रशांत) धोरण. BRI च्या मुद्द्यावर चीनचा असा समज आहे, की चीन आणि इंडीया प्लस वन अशा रचनेचा प्रस्ताव मांडून चीनने भारताला सामावून घेण्याचा पुरेसा प्रयत्न केलेला आहे. उलट, भारतच हे समजून घेत नाहीये, की चीन विकसित करत असलेला मारिटाईम सिल्क रोड इनिशिएटिव्ह हा कोणत्याही देशाला आव्हान देण्यासाठी नसून फक्त दक्षिण आशियात चीनला धोरणात्मक स्थैर्य मिळावे यासाठी आहे.[79] इन्डो-पॅसिफिकच्या संदर्भाने, चिनी सरकारने असा निष्कर्ष काढला आहे, की चीनला प्रतिबंध करणे हेच भारताचे उद्दिष्ट आहे. भारत मोठ्या नैतिकतेने, "प्रदेशातल्या सर्वांसाठी सुरक्षा आणि विकास" आणि "इन्डो-पॅसिफिक व्हिजन" असे म्हणत असला, तरी त्याचे अंतस्थ हेतू वेगळे आहेत, असे बीजिंगला वाटते.[80] सागरी क्षेत्राच्या संदर्भाने सर्वांपासून लांब राहण्याचे पारंपरिक धोरण मोदी सरकारने मागे सोडले आहे आणि आता अमेरिकेबरोबर धोरणात्मक समन्वय साधत तो याच भागात पुढाकार घ्यायला लागला आहे, असे चिनी धोरणकर्त्या समूहाला वाटते. चिनी परराष्ट्र मंत्रालयाशी संलग्न असलेल्या चायनीज इन्स्टिट्युट ऑफ इंटरनॅशनल स्टडीजचे उपाध्यक्ष, रॉन्ग यिंग यांचे असे मत आहे की, चीनच्या स्वारस्याच्या मुद्द्यांना आणि भारत आणि चीन यांमधल्या धोरणात्मक समझोत्याला धक्का पोचला तरी चालेल,

पण भारत फक्त सगळ्यांना सांभाळून घेणारा देश नाही, तर नेतृत्व करणारी एक खंबीर सत्ता आहे हे दाखवून देणे, हे मोदींचे उद्दिष्ट आहे.[81] भाजपाची राजकीय विचारधारा हे याच्या मागचे प्रमुख कारण आहे असे मानले जाते. संपूर्ण भारतापेक्षा भाजपाच्या राजकीय मतांशी अनुषंगिक असे भारताचे धोरण आखले जात आहे असे दिसत आहे.[82] भारतात हिंदू राष्ट्रवादाचा झालेला उदय आणि त्याचा भारत-चीन संबंधांच्या विकासात निर्माण झालेला अडसर आणि त्याच वेळी मोदी भारताचे पंतप्रधान झाल्यापासून दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये झालेली घसरण याचा चीनवर खोलवर परिणाम झाला आहे. त्याच वेळेला, एक सार्वत्रिक मत असेही आहे, की मोदींच्या विचारधारांतून एक सुंदर दृष्टी दिसते खरी, पण ती वास्तवावर आधारित नाही.[83] चिनी विद्वानांचे असे मत आहे, की प्रत्येक जागतिक मानकाच्या कसोटीवर भारत चीनच्या कित्येक योजने मागेच आहे आणि मोदी सरकारची सगळी कामगिरी सामाजिक दुफळी, खराब पायाभूत सुविधा आणि फारशी वाढ न होणारी आर्थिक कामगिरी – अशा अत्यंत ठिसूळ पायावर उभी आहे.[84] अशी शक्यता आहे, की याच समजुतीतून चिनी लष्कराने भारतविरुद्ध प्रत्यक्ष सीमारेषेलगत अधिक आक्रमकपणा दाखवला असावा. २०१३ पासून तिथे वेळोवेळी जे संघर्षाचे प्रसंग निर्माण होत आहेत त्याचेही उत्तर यातून मिळते. स्वत:बद्दल फार मोठ्या प्रमाणात असलेल्या गैरसमजुतीतून भारत एक मोठी सत्ता होण्याचे स्वप्न बघत आहे, असे म्हणत चिनी विश्लेषक ती शक्यताही झिडकारून टाकतात. इथपर्यंत आल्यावर हे विश्लेषक फार सहजपणे याही निष्कर्षावर येऊन पोचू शकतात, की चीनच्या धोरणात्मक शत्रूंना बरोबर घेऊन भारत या प्रदेशात स्वत:च्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करेल आणि योजना राबवेल.[85]

## चीन आणि शी यांच्या कारभाराबद्दल भारताचे मत

२०१२ मध्ये चीनमध्ये जो सत्ताबदल झाला, त्याचा भारतीय अभ्यासकांनी बारकाईने अभ्यास केला. वेगळ्या पिढीकडून आता सत्तांतरण झालेले होते. शी यांच्याबद्दल फारशी माहिती कोणाला नव्हती. अनेक भारतीय धोरणात्मक विश्लेषकांना असे वाटले की स्थानिक मुद्यांच्या एकत्रीकरणात शी यांना अधिक लक्ष द्यावे लागेल.[86] चीन नेहेमीप्रमाणे दणदणीत आर्थिक वाढीचे आकडे नोंदवत राहील अशी बहुतांश भारतीयांची अपेक्षा होती, आणि चीनला मिळणाऱ्या मोठ्या प्रमाणावरच्या आर्थिक यशाचे कौतुक सगळ्यांनाच वाटत होते. एकंदर सर्वसामान्यांचे चीनबद्दलचे मत सकारात्मक होते. चीनच्या भू-राजकीय हालचालींबद्दल धोरणकर्त्यांचा समूह आणि उच्चभ्रू थोडे सावध होते, पण दोन देशांतल्या एकूण संबंधांबाबत कोणीच फारसे निराशावादी वाटत नव्हते.[87] शी यांच्या कार्यकालाच्या पहिल्या टप्प्यात असे सर्वसाधारण मत होते, की भारत-चीन संबंध सुरळित सुरू राहतील. अधूनमधून चीन भू-राजकीय कुरापती काढत राहील, पण मागच्या एक दशकापासून चीनच्या वागणुकीची ती पद्धतच झालेली होती.[88]

दक्षिण चिनी समुद्र इथे चीनने मारलेली मुसंडी, त्याच वेळेला भारत-चीनच्या प्रत्यक्ष सीमारेषेजवळ (LAC) चीनने मोठ्या प्रमाणावर केलेली हालचाल, २०१३ च्या शेवटी शी यांनी अस्ताना इथे BRIबद्दल आणि जकार्ता इथे मारिटाइम सिल्क रोडबद्दल केलेल्या समांतर घोषणा या सर्वांमुळे भारतीय अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले. शी ते चिनी नेते झाले होते, ज्यांनी परराष्ट्र योजनांच्या अंमलबजावणीकडे त्यांच्या आधीच्या सत्ताधाऱ्यांपेक्षा अधिक जोरकसपणे लक्ष दिले. शी यांनी BRI अंतर्गत चीन-पाकिस्तान-इकॉनॉमिक-कॉरिडॉर या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची केलेली घोषणा, आणि त्याचबरोबर पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या जम्मू आणि काश्मिरच्या भूभागात सुरू केलेले प्रकल्प, यांमुळे भारताच्या चीनकडे बघण्याच्या दृष्टीकोनात बदल झाला.[89] चीन-पाकिस्तान संबंधांबाबत भारत नेहेमीच अतिशय संवेदनशील राहिलेला आहे. पण त्याला वास्तवाच्या या स्वीकाराची किनारही आहे, की कितीही आग्रह केला तरी ती धोरणात्मक आघाडी संपुष्टात येणार नाही.[90] पण दिल्लीच्या दृष्टीने CPEC चा प्रकल्प म्हणजे भारताच्या संवेदनशील मुद्द्याकडे मुद्दामहून दुर्लक्ष करण्याचीही पुढची पायरी आहे.[91]

या संबंधांची गाडी रुळावरून घसरतच गेली. पाकिस्तानातून कारवाया करणाऱ्या च्या जैश-ए-मोहम्मदच्या मसूद अझहर या म्होरक्याचे नाव अतिरेकी म्हणून घोषित करायला २०१६ आणि २०१७ मध्येसुद्धा चीनने परत एकदा खोडा घातला. न्यूक्लिअर सप्लाइज ग्रुपमध्ये भारताला सदस्यत्व मिळण्यासाठी २०१६ साली चीनने विरोध केला. LAC लगत तर चीन भारताचा कस पहातच होता आणि पाकिस्तानने बळकावलेल्या जम्मू-काश्मिरच्या भूभागात चिनी (PLA) आणि पाकिस्तानी लष्कर मिळून गस्त देत आहेत अशा बातम्यादेखील मिळाल्या आहेत. व्यापार आणि गुंतवणूक या दोन माध्यमांतून कोणतेही संबंध सांधले जाऊ शकतात, पण व्यापारी हेतू आड आले आणि हे दोन्हीही ठप्प झाले. २०१२ मध्ये असलेली $२८.८७ बिलियनची तूट २०१७ मध्ये $५१ बिलियनपर्यंत जाऊन पोचली.[92] ही तूट भरून निघणे अशक्य आहे. चीनने हा मुद्दा फारशा

गांभीर्याने कधीच घेतला नाही, आणि प्रक्रियेच्या त्रुटींमध्ये काही सुधारणा करणे शक्य आहे का, याची चाचपणीही कधी केली नाही. चीनने असा दावा केला, की भारतीय उत्पादनांना स्पर्धात्मक धार नाही, पण भारतीय औषधे, माहिती तंत्रज्ञान आणि वाहन उद्योग यांचा अत्यंत यशस्वी शिरकाव इतर स्पर्धात्मक बाजारपेठांमध्ये झालेला आहे; तो केवळ चिनी बाजारपठेत का होऊ शकत नाही, याचे उत्तर चीनने कधी दिले नाही. आणि, २०१४ मध्ये शी यांनी $२० बिलियन गुंतवणुकीचे आश्वासन देऊनही चीनने भारतात भरीव गुंतवणूक केली नाही.[93]

मग यावर भारताने प्रतिक्रियात्मक पावले उचलली तेव्हा चीनला त्याचा राग आला आणि त्याचे खापर त्याने उजव्या किंवा हिंदू राष्ट्रवादाच्या दबावावर फोडले. हु आणि वान्ग जुएसारखे विश्लेषक म्हणतात की, “भारताच्या राजनैतिक वातावरणात उजव्या दिशेने झुकलेले घटक आहेत, ज्यांनी चीनबरोबर कडक परराष्ट्र धोरण अंगीकारावे अशी मोदींच्या प्रशासनाची तयारी करून घेतलेली आहे.”[94] भारतात अशी भावना वाढीस लागलेली होती, की भारताला वाटणाऱ्या चिंतांबद्दल शी फारशी संवेदनशीलता दाखवत नाही आहेत आणि या संबंधांमधली समीकरणे बदललेली आहेत.[95] २०१७ मध्ये डोकलाम संघर्षाच्या वेळी हे मुद्दे शिगेला पोचले.[96] भारताच्या दृष्टीकोनातून पाहिले, तर चीनला डोकलाम पठारावर घुसखोरी करून जम्फेरी (किंवा झोंपेलरी) कड्यावर स्वत:चा एकांगी दावा करून तो ताब्यात घ्यायचा असावा. पण त्यामुळे राजीव गांधी- डेंग शाओपिंग यांच्यात संघर्षाच्या मुद्द्यांवर शांततेच्या मार्गाने तोडगा काढण्यासाठी जे एकमत झालेले होते, त्या मूळ उद्दिष्टावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. भारतीय अभ्यासकांनी असे मत नोंदवले की, “सध्याच्या मोडस व्हिवेंडीची फेरआखणी करायला हवी आणि भारत-चीन संबंधांमध्ये समतोल साधला जाईल असे नवीन समीकरण शोधायला हवे, कारण दोन्ही देशांनी त्यांना संवेदनशील वाटणाऱ्या मुद्द्यांचा परीघ वाढवलेला आहे असे दिसते आणि आता दोन्ही देश सहजपणे दुखावले जात आहेत.”[97]

भारत-चीन संबंधांमध्ये अविश्वास आणि एकमेकांबद्दल असलेल्या गैरसमजांचा एक धागा नेहेमीच विणलेला होता. त्यात एकमेकांच्या सद्य नेतृत्वांबद्दल असलेल्या दृष्टीकोनाचीही महत्त्वपूर्ण आणि उघड भर पडली. बीजिंगला असे वाटते, की मोदी सरकार अधिक आक्रमक आहे, चीनच्या महत्त्वाच्या मुद्द्यांबद्दल त्याला फारसे गांभीर्य वाटत नाही आणि चीनच्या शत्रूंची बाजू हे सरकार घेईल. भारत चीनकडे एक धोरणात्मक चिंता या दृष्टीने बघतो, कारण चीनच्या स्वत:ची धोरणे किंवा त्याच्या कृती यांतून भारताला तसाच संदेश मिळतो, हे चीन मान्यच करत नाही. त्यांच्या आधीच्या सरकारांनी आखलेला चर्चा आणि संवादाचा मार्ग मोदींनीही खुला ठेवलेला आहे (जेव्हा ते विविध परिषदांच्या वेळी भेटतात) या वास्तवाकडे चीनने कोणतेही महत्त्व दिलेले नाही असे दिसते. चीनबरोबर आपले मतभेद आहेत हे मोदींनी नाकारले नाही, उलट ते खुबीने मान्य केले आहेत; त्याचबरोबर भारताच्या मुख्य स्वारस्यांबद्दल ठामपणे बोलताना त्यात एक आत्मविश्वासही दिसतो; आणि ते अशाच वागणुकीची अपेक्षा समोरच्याकडूनही ठेवतात. त्यांच्या आधीच्या सत्ताधाऱ्यांच्या वागणुकीपेक्षा ही पद्धत मुळातूनच वेगळी आणि सकस आहे.[98] मोदी मांडत असलेल्या या नवीन वास्तवाचा बीजिंगला स्वीकार करता आलेला नाही, उलट त्याने जास्त गैरसमज करून घेतला आहे. याचे आणखी एक कारण असू शकते, की १९८८ पासून २०१४ पर्यंत चीन फक्त आघाडी सरकारांबरोबर चर्चांच्या फेऱ्या करत होता. पण जे सरकार पूर्ण बहुमतात आहे ते परराष्ट्र धोरणात अधिक लवचिकपणा आणू शकते याची जाणीव बीजिंगला झाली नसावी.

शी यांच्या चीनच्या सद्य प्रशासनाबद्दल भारतातली समजूतही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर बदलत आहे. चीनचे राष्ट्रीय उद्दिष्ट आहे “जागतिक मंचाचे केंद्र आहे त्याच्या अधिकाधिक जवळ जाणे”.[99] याकरता चीन म्हणेल तसे भारताने केले नाही, तर भारताला वाटणाऱ्या चिंतेच्या मुद्द्यांना पायदळी तुडवायला चीन मागेपुढे पाहणार नाही, असा सध्याच्या शी यांचा चीन देश आहे, असे भारताचे मत झाले आहे. भारतीय अभ्यासक तर आता असेही मानायला तयार आहेत, की भारताला वाटणाऱ्या चिंतेच्या मुद्द्यांबाबत चीन मुद्दामच असंवेदनशीलता दाखवतो आणि ते त्यांचे हेतूपुरस्सर आखलेले धोरण आहे.[100] चीनबरोबर चर्चात्मक संवादांचा फायदा फक्त चीनलाच होतो असे सार्वत्रिक मत आहे.

दोन्ही बाजूंना उभयतांबद्दल हेही वाटते आहे, की दुसरा देश आता राष्ट्रवादाचा मुद्दा जरा जास्तच वापरत आहे. समोरच्या देशाच्या राजकीय पद्धतींबद्दल आता दोन्ही बाजूंनी उघडपणे टीका व्हायला लागली आहे.[101] प्रत्येक बाजूच्या स्वत:बद्दल असलेल्या समजुती आणि त्याचबरोबर समोरच्या बाजूबद्दल असलेल्या समजुती यांमधली दरी वाढत आहे. दोन्ही देशांना एकमेकांच्या अस्तित्वाबद्दल असलेल्या जाणिवेत फरक आहे आणि एकमेकांची धोरणे समजूत घेण्याच्या दृष्टीकोनातही फरक आहे, त्यामुळे गैरसमज होत आहेत. काहीतरी काळेबेरे आहेच असे गृहित धरून एकमेकांच्या धोरणांवर टीका करण्याची प्रवृत्ती वाढत आहे आणि त्यामुळेच एकमेकांना संशयाचा फायदा देण्याची इच्छाही कमी होत आहे.

हेतूंबद्दल शंका आणि एकमेकांच्या अस्तित्वाबद्दलच्या जाणिवेतली कमतरता दिवसेंदिवस वाढत असताना या संबंधांमध्ये एक बाह्य घटकही मिसळला आहे, ज्याकडे परत एकदा दोन्ही बाजूंनी दोन वेगळ्या दृष्टीकोनातून पाहिले आहे. जेव्हा चीन आपल्याकडे दुर्लक्ष करत आहे असे भारताला वाटले, तेव्हा अमेरिकेने भारताशी जवळीक साधली. विविध पातळ्यांवर स्वत:च्या विकास साधण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी अमेरिकेबरोबर भागीदारी करणे भारताला धोरणात्मक फायद्याचे वाटले, पण चीनने याकडे चीन-अमेरिका शत्रुत्वाच्या संकुचित नजरेने पाहिले. भारताचे अमेरिकेबरोबर संबंध आहेत, या वास्तवाचा हात या विश्वास ढासळण्यामागे होता का?

## भारत-चीन-अमेरिकेचा त्रिकोण

आशियात स्थानिक पातळीवर शांतता कायम राहील याची हमी अमेरिकेने १९४५ पासून घेतलेली आहे. चीनला अमेरिकेचे वैचारिक पातळीवर नेहेमीच आव्हान वाटत राहिले, पण चीनच्या आधुनिकीकरणासाठी अमेरिकेचे भांडवल आणि तंत्रज्ञान गरजेचे होते, त्यामुळे स्वत:च्या ताकदीबद्दल पुरेसा आत्मविश्वास येईपर्यंत अमेरिकेच्या वर्चस्वाशी बीजिंगने जुळवून घेतले[102]. भारत आणि अमेरिका समान पातळीवर कधीच नसतीलदेखील, पण त्यांच्यातले मतभेद वैचारिक पातळीवरचे कधीच नव्हते. स्वत:चे आधुनिकीकरण करायचे असेल ,तर अमेरिका महत्त्वाचा भागीदार असेल असे भारताला वाटते. इन्डो-पॅसिफिक प्रदेशात अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान देण्याची तयारी चीन करत असताना आणि स्थानिक आणि धोरणात्मक आवश्यकतेपोटी भारत आपली सामरिक धोरण पुन्हा आखत असताना इन्डो-पॅसिफिक प्रदेशात अमेरिकेचे अस्तित्व तपासायला हवे; विशेषत: भारत-चीनच्या संबंधांच्या भविष्यावर त्याचा काय परिणाम होऊ शकतो हे तपासणे गरजेचे आहे.

### चीनचा दृष्टीकोन

अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट, जॉन फॉस्टर ड्युल्स सॅन फ्रॅन्सिस्को इथे भरलेल्या परिषदेत जेव्हापासून म्हणाले की बदल घडवून आणण्यासाठी अमेरिका "शांततेच्या मार्गाने क्रांती" घडवण्याचे धोरण अवलंबेल, तेव्हापासून चायनीज कम्यूनिस्ट पार्टी अमेरिकेला आपला शत्रू समजत आलेली आहे. ड्युल्स यांच्या भाषणावर माओ यांच्या प्रतिक्रियेबद्दल भूतपूर्व चिनी नेते बो यिबो म्हणतात, "माओ म्हणाले, की अमेरिकेला आम्हाला उध्वस्त करायचे आहे आणि बदलायचे आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर तिला आमची व्यवस्था बदलायची आहे आणि स्वत:ची यंत्रणा राबवायची आहे. शांततेच्या मार्गाने क्रांती घडवून आणून तिला आमची व्यवस्था भ्रष्ट करायची आहे."[103] माओ यांच्या हा ठाम समज पुढच्या प्रत्येक चिनी नेत्याने अनुसरला. त्यामुळेच भारताची अमेरिकेशी असलेली जवळीक चीनच्या दृष्टीने चिंतेचे कारण आहे. १९९० च्या सुरूवातीपासून ते २००८ पर्यंत चीन-अमेरिका संबंध बरेचसे तणावरहित असताना ही चिंता काही अंशी कमी झाली होती, पण ती कधीच पूर्णपणे गेली नाही.

२००८ हे वर्ष भारत-अमेरिका-चीन या त्रिकोणासाठी अतिशय महत्त्वाचे होते असे चिनी आणि भारतीय विश्लेषक मान्य करतात. एका चिनी अभ्यासकाच्या मते, याच वर्षात अमेरिकेचा एक प्रमुख धोरणात्मक स्पर्धक म्हणून चीनचा उदय झाला, तर भारत त्याचा समकक्ष झाला.[104] आणखी काही जण हे अधिक स्पष्टपणे मांडतात- अमेरिकेने आपली धोरणे बदलली, भारत आणि पाकिस्तानला एकमेकांपासून वेगळे करणे आणि भारत आणि चीनला एकमेकांच्या जवळ आणण्याची नीती अमेरिकेने अंगीकारली.[105] एका बाजूला अमेरिकेचा आशियाच्या दिशेने झुकलेला कल आणि भारताने सामरिक हद्दीवर केंद्रित केलेले लक्ष, तर दुसऱ्या बाजूला चीनने आपल्या नाविक दलाचा केलेला विस्तार आणि हिंदी महासागरात अधिकाधिक खोलवर घुसण्याचे त्याचे प्रयत्न यांचा एकमेकांशी थेट संबंध आहे असा निष्कर्ष अनेक चिनी अभ्यासकांनी काढला आहे. हे विश्लेषक असेही म्हणतात, की चीनला हिंदी महासागराचा वापर करू न देणे हे अमेरिका आणि भारताचे एकत्रित धोरणात्मक उद्दिष्ट आहे, आणि त्यामुळे चीनला देखील हिंदी महासागरात उतरेल असे नाविक दल निर्माण करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.[106] भौगोलिक पटावर धोरणात्मक समानता रहावी याकरता चीनला नाविक दल निर्माण करावेच लागले, असे समर्थन चीन करतो. हिंदी महासागरात चीनने उभे केलेले तळ हे त्याचे स्वत:चे हित जपण्यासाठी आहेतच आणि त्याच बरोबर मालवाहतुकीला त्यामुळे आंतरराष्ट्रीय संरक्षणदेखील मिळते असा बचावही चीन करतो.[107]

काही चिनी अभ्यासक याची नोंद करतात, की चीनच्या कृतींमुळे भारत सचिंत झालेला असू शकतो, पण ते हेही नोंदवतात, की भारत गरजेपेक्षा जास्त चिंता करत आहे आणि त्याच्या चिंतेची दिशादेखील चुकीची आहे.[108] स्थानिक सत्तेची समीकरणे बदलणे हे मारिटाईम सिल्क रोडचे उद्दिष्ट नाही आणि हिंदी महासागरात चीनने आपले अस्तित्व दाखवले, तर त्याच्या अर्थ त्या प्रदेशात भारताच्या पारंपरिक भूमिकेला चीन छेद देत आहे असाही होत नाही.[109] काही जण तर असाही दावा करतात, की इन्डो-पॅसिफिक प्रदेशामधल्या भू-राजकीय रचना बदलण्याचा चीनचा उद्देश नसून, त्याच्या स्वत:च्या स्थैर्यासाठी आणि वाढीसाठी तो सद्य राजनैतिक स्थिती जपण्याचाच प्रयत्न करत आहे.[110] तात्पर्य असे, की चिनी विद्वानांच्या दृष्टीने भू-राजकीय प्रभाव टाकण्यासाठी नव्हे, तर आर्थिक बळकटीकरणाच्या गरजेपोटी हिंदी महासागरात मुक्त व्यापार करार, नवीन बंदरे आणि इतर सोयीसुविधांची उभारणी चीन करत आहे.[111] यामुळे ते म्हणतात, की चीनबद्दल पश्चिमेने बाळगलेले जे गैरसमज आहेत त्याचा प्रभाव भारतावर पडत आहे आणि त्यामुळे भारतही चीनच्या उद्देशांकडे चुकीच्या दृष्टीने बघत आहे.[112] चिनी विद्वान आग्रहाने हे सांगतात, की या प्रदेशात दोन्ही देशांचे समान हितसंबंध आणि जबाबदारी आहे हे जर भारताने मान्य केले, आणि त्रयस्थ देशांनी उभे केलेले अडथळे भारताने ओलांडले, तर द्विपक्षीय विवादास्पद मुद्दे असूनही, भारताला एक धोरणात्मक भागीदार म्हणून चीन स्थान देऊ शकतो.

मलक्काच्या पेचप्रसंगाच्या संदर्भाने, चिनी धोरणकर्त्यांच्या समूहाचा खरेच असा समज असावा का, की चीनच्या जहाजबांधणी आणि व्यापारासाठी भारत धोकादायक आहे? अनेक चिनी अभ्यासकांनी असे मत व्यक्त केलेले आहे, की हिंदी महासागराच्या उत्तरेला भारताला आपला प्रभाव कायम ठेवायचा आहे, पण या प्रदेशात चीनची समुद्री मार्गातून जी संपर्काची साधने आहेत त्यांना भारताच्या हालचालींमुळे धोका संभवतो असे निरिक्षण फार कमी अभ्यासकांनी नोंदवले आहे. एशिया- पॅसिफिक या प्रदेशात हब-ॲन्ड-स्पोक्स अलायन्स सिस्टिम नावाची प्रणाली कार्यरत आहे. चीनची कोंडी करण्यासाठी या प्रणालीचे रूपांतर अधिक घट्ट विणलेल्या सुरक्षा जाळ्यात करायचा प्रयत्न अमेरिका करत आहे. हे जाळे इन्डो-पॅसिफिक प्रदेशातून जाते, ज्यात भारताचाही सहभाग आहे, म्हणून चीनला चिंता वाटत असावी.[113] हिंदी महासागरात चीनला हाताळण्यासाठी भारत एक विश्वास ठेवण्यालायक भागीदार देश होऊ शकतो हे अमेरिकेला दाखवून देण्याची संधी भारताला आहे. समतोल राखण्यासाठी आणि सत्तेच्या समतोलाचे राजकारण करण्यासाठी चर्चेसाठी नेहेमीच कटीबद्ध असलेला देश म्हणजे भारत, अशी प्रतिमा मोदी सरकार निर्माण करताना दिसत आहे.[114] स्थानिक सत्तेचा लंबक स्वत:च्या दिशेने करण्यासाठी भारत अमेरिकेला मदत करत आहे. ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिका या देशांमधला क्वाड्रिलॅटरल सेक्यूरिटी डायलॉग परत एकदा सुरू झालेला आहे. यामुळेही चिनी अभ्यासकांचे असे मत झालेले आहे, की अमेरिकेच्या चीनला प्रतिबंध करण्याच्या ज्या योजना आहेत त्यात भारताचाही सहभाग आहे.[115] याचा परिणाम म्हणून, प्रशांत आणि हिंदी महासागरातल्या उत्तरेकडच्या प्रदेशात धोरणात्मक समतोल साधण्याच्या प्रयत्नांत चीनची पीछेहाट झाली आहे. परिणामी, भारताचे वर्चस्व असलेल्या त्याच्या सागरी प्रदेशात चीन धोरणात्मक मुसंडी मारण्यात फारसा यशस्वी होऊ शकलेला नाही, आणि त्यामुळे या दोन देशांमध्ये तणाव वाढायला लागलेला आहे. चीनचे असे मत आहे, की हिंदी महासागरात चीन-भारताची जी स्पर्धा सुरू आहे त्यामुळे अमेरिकेचे हेतू आणि मोदींचे परराष्ट्र धोरण दोन्ही यशस्वी होत आहेत.

चीनच्या दृष्टीकोनातून, भूतपूर्व अमेरिकन अध्यक्ष, डोनाल्ड ट्रंप यांच्या कार्यकाळात चीन-अमेरिका संबंधांमधल्या रचनेचा विरोधाभास वाढत गेल्या. एकमेकांबरोबर सुरू असलेल्या आर्थिक सहकार्यामुळे अमेरिका-चीन संबंधांना स्थैर्य मिळत होते, पण वॉशिंग्टनने व्यापार युद्ध सुरू केल्यानंतर हा पाया खचला. किंवा, यान म्हणतात त्याप्रमाणे, “मैत्रीचा दिखावा” करण्याचा कालखंड संपत आला.[116] चिनी विद्वानांच्या मते, जो बायडेन यांच्या नवीन अध्यक्षीय कारकिर्दीत परिस्थितीमध्ये मूलभूत पातळीवर काही बदल होतील असे वाटत नाही.[117] चीनची वाढ रोखण्यासाठी, किंवा तिचा वेग कमी करण्यासाठी इन्डो-पॅसिफिक प्रदेशात अमेरिका अधिक वेगाने नवनवीन बांधकामे करेल अशीच अपेक्षा चीन करत आहे. ट्रम्प यांच्या प्रशासनाच्या काळात अमेरिकेने भारताबरोबर अधिक घट्ट सुरक्षा संबंध प्रस्थापित केले होते. २ + २ मंत्र्यांची नेमणूक, (द लॉजिस्टिक्स एक्स्चेंज मेमोरँडम ऑफ ॲग्रीमेंटसारखे) धोरणात्मक बंध अधिकाधिक घट्ट करणारे करार आणि दोन्ही देशांच्या नौदलाची एकमेकांबरोबर काम करायची क्षमता अशा योजना कार्यान्वित झाल्या होत्या. चीन त्यांचा बारकाईने अभ्यास करत आहे.

अमेरिकेशी जवळीक असल्यामुळे, २०१७ पासून चीनच्या परराष्ट्र धोरणाच्या फेरआखणीत इन्डो-पॅसिफिक प्रदेशाच्या संदर्भाने भारताला विशेष स्थान देण्यात येत आहे.[118] हल्लीच काही विद्वानांनी हे ठामपणे सांगितले आहे, की चीनने असे ठरवले आहे की भारत अमेरिकेच्या बाजूने झुकलेला

आहे, आणि चीनवर निर्बंध घालण्याचा त्यांचा उद्देश आहे.[119] काही जणांना असेही वाटते, की भारत-अमेरिका संबंध यांच्याकडे मैत्रीपूर्ण संबंधांसारखे बघता येणार नाही, कारण भारताने आपली धोरणात्मक स्वायत्तता सोडलेली नाही.[120] अशीदेखील शक्यता आहे, की एक सावध पवित्रा म्हणून आणि भारतावर बाह्य दबाव टाकण्यासाठी चीन हा मैत्रीचा वाद उकरून काढत असेल, पण त्याचबरोबर भारताकडे केवळ अमेरिकेच्या नजरेतून बघण्याची तीच मूलभूत चूक चीन करत असावा. इन्डो-पॅसिफिकमध्ये भारत-अमेरिकेची जवळीक असण्याची शक्यता गृहित धरून शी यांच्या चीनला या प्रदेशातल्या त्यांच्या देशाच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव एक ताकदवान सागरी सत्ता निर्माण करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. त्यामुळे पॅसिफिकच्या पश्चिमेला आणि मलक्का स्ट्रेटच्या पलीकडेदेखील धोरणात्मक समतोल राखण्यासाठी नवीन विचार चीन करत असावा.[121] या दृष्टीकोनातून पाहिले, तर भारत-चीन संबंधांमधली गुंतागुंत खूप मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

## भारताचा दृष्टीकोन

हिंदी महासागर हा अनेक कारणांमुळे भारतासाठी अतिशय महत्त्वाचा झालेला आहे, आणि १९९८ पासून स्थापन झालेल्या प्रत्येक सरकारने समुद्री प्रदेशांवर लक्ष केंद्रित करून भारताच्या धोरणांमध्ये फेरबदल केलेले आहेत. वाजपेयींच्या सरकारने ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी व्हेसल (आण्विक पाणबुडी) प्रोग्रॅम सुरू केला आणि अंदमान आणि निकोबार कमांडची स्थापना केली. सिंग यांच्या सरकारने घाई करून आण्विक पाणबुडी कार्यक्रमाला वेग दिला आणि *आयएनएस विक्रांत* या संपूर्ण भारतीय बनावटीच्या विमानवाहू जहाजाच्या बांधणीचा निर्णय घेतला. हे नाकारण्यात काहीच अर्थ नाही, की हिंदी महासागरात चीनचा वाढता वावर हे एक महत्त्वाचे कारण या निर्णयांमागे होते. १९९० च्या उत्तरार्धापासून अनेकदा चीनच्या लष्करी नोंदींमध्ये आणि चिनी लेखनांतही हिंदी महासागराचे उल्लेख केलेले भारतीय अभ्यासकांना आढळायला लागले होते.[122] १९९० मध्ये खरेदी केलेल्या रशियन कुझनेत्सोव-क्लास विमानवाहू जहाजामुळे भारतीय अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले. हिंदी महासागराच्या उत्तर भागात भारताचा प्रभाव आहे असे सहसा मान्य केले जाते. भूतकाळात भारताने इतर देशांना सहन केलेले आहे आणि चीनच्या आर्थिक विस्तारानंतर समुद्रमार्गे होणाऱ्या संपर्काच्या साधनांना संरक्षण देण्यासाठी चीन स्वत:ची उपकरणे विकसित करेल हे अपेक्षितच होते. पण या प्रदेशात चीनला भारत आव्हान देईल असा नकारात्मक सूर PLA (चिनी लष्कर)च्या लेखनात यायला लागल्यामुळे भारतीय विश्लेषकांना चिंता वाटायला लागली.[123]

भारताने अमेरिकेबरोबर सागरी संबंध विकसित केल्यामुळे चीनची चिंता वाढायला लागली असे दिसते. भारताच्या स्वारस्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून त्याने हिंदी महासागरात जी मुसंडी मारली, त्याचाच हा परिपाक असू शकतो हे चीन लक्षातही घेत नाही आहे. कोणत्या काळात काय झाले हेही लक्षात घेणे इथे अगत्याचे आहे. या शतकाच्या पहिल्या दशकाच्या शेवटी म्यानमारमधल्या क्याउकफूपासून पाकिस्तानातल्या ग्वादार बंदरापर्यंत चीनने भारतीय द्विकल्पाच्या बाजूने नवीन बंदरांचे बांधकाम आणि मजबूतीकरण सुरू केले. त्याला "मोत्यांची माळ" असे गोंडस नावही दिले. भारताला याची चिंता वाटणे सहाजिकच आहे हे मान्य करण्याऐवजी, हिंदी महासागरात चीनने जी पायाभूत सुविधांची उभारणी केली त्याला मारिटाईम सिल्क रोड प्रकल्पाचा भाग समजले जावे, असे सांगून त्याने भू-धोरणात्मक सारवासारव केली. हर्ष पंत यांनी नोंदवले आहे, "भारताच्या परिघाच्या बाजूने चीनने बंदरे आणि त्यावरच्या सुविधांचे केलेले बांधकाम हे पूर्णपणे आर्थिक आणि व्यापारी कारणांसाठी आहे असे चीन म्हणू शकतोच, पण भारताच्या दृष्टीने पाहिले तर विविध पद्धती वापरून भारताला प्रतिबंध करण्याची ही योजना आहे असे दिसते."[124]

भारताच्या समजुतींना किंवा चिंतांना दूर करण्याचे किंवा चर्चा करून तोडगा शोधण्याचे कोणतेही प्रयत्न झाले नाहीत. दक्षिण चिनी समुद्र आणि हिंदी महासागराच्या उत्तर भागात नाविक हालचाल करून भारताच्या जीवावर चीन धोरणात्मक फायदा करून घेत आहे असे दिसते.[125] या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिकेचे एकत्र येणे तपासायला हवे. चीनच्या नाविक दलाचा विस्तार आणि त्या प्रदेशात त्याने जोरकसपणा दाखवयाला सुरुवात केल्यानंतर एशिया-पॅसिफिक आणि हिंदी महासागरासाठी केलेली इन्डो-अमेरिकन जॉइंट स्ट्रॅटेजिक व्हिजन योजना आणि लॉजिस्टिक्स एक्स्चेंज मेमोरँडम ऑफ अग्रीमेंटसारख्या विविध करारांचे सूतोवाच करण्यात आले. भारताच्या दृष्टीकोनातून भारत-अमेरिका संबंधांकडे बघण्याऐवजी चीन त्याकडे चीन-अमेरिका शत्रुत्वाच्या संदर्भानेच बघत आहे. त्यामुळे चीनने असा निष्कर्ष काढलेला आहे, की अमेरिकेने चीनला घातलेला घेराव आणि त्यामुळे चीनला केलेला प्रतिबंध आणि त्यात भारताने अमेरिकेबरोबर केलेले नाविक सहकार्य यामुळे अमेरिकेबरोबर भारताचाही यात सहभाग आहे हे सिद्ध होते.

प्रस्तुत लेखकाला असे ठामपणे वाटते, की चिनी विश्लेषकांनी मोदींची इन्डो-पॅसिफिक योजना समजून घ्यायला हवी. आर्थिक सुरक्षा, ऊर्जेची जपणूक, इस्लामिक मूलतत्त्ववाद आणि दहशतवाद, अंमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांची तस्करी, त्याचबरोबर स्थानिक गरजा, जशा की बेट प्रदेशांचा विकास, विशेष आर्थिक क्षेत्राची जोपासना आणि सागरी दळणवळणाचे निर्माण अशा अनेक पैलूंकडे भारतालाही पुरेसे लक्ष द्यावे लागते. सामरिक क्षेत्रामध्ये जसे चीनने हातपाय पसरले आहेत, त्याप्रमाणे भारताचेही या प्रदेशात हितसंबंध विस्तारले आहेत. चीनला धोरणात्मक पातळीवर दळणवळणासाठी जागा द्यायला हवी याचा भारताने कधीच इन्कार केलेला नसताना, चिनी विश्लेषक मात्र भारताने अमेरिकेबरोबर केलेल्या सागरी सहकार्याच्या हेतूंबद्दल सतत प्रश्न उपस्थित करत आहेत. हे सहकार्य संपवले तरच समस्या सुटेल असे त्यांना वाटत असेल, तर ते अतिशय स्वार्थी आणि फक्त चीनच्या स्वत:च्या फायद्याचा विचार करण्यासारखे आहे. अमेरिकेबरोबर तीन दशके सहकार्याचे संबंध ठेवून चीनने मोठ्या प्रमाणावर फायदा करून घेतलेला आहे. भारत-अमेरिका सहकार्याचा हेतू हा केवळ चीनचा उत्कर्ष थांबवण्यासाठी आहे असा हाकारा केवळ "लांडगा आला रे" पद्धतीचा आहे.

भारताच्या हेतूंबद्दल चीनला अविश्वास वाटायचे आणखी एक कारण म्हणजे क्वाड हे आहे, ज्याचा खोलवर अभ्यास करायला हवा. २००७ मध्ये जेव्हा क्वाडची कल्पना प्रथम मांडली गेली, तेव्हा बीजिंगकडून ज्या कडक शब्दांत त्यावर प्रतिक्रिया आली, तेव्हाच काही इतर कारणांमुळे चीनला अस्वस्थता वाटत असावी हे स्पष्ट झाले.[126] २००३ मध्ये तत्कालीन अध्यक्ष हू जिंताओ चीनच्या "मलाक्का द्विधे"बद्दल बोलले, त्यानंतर चीनने आपले नाविक बळ वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले. २०१० नंतर चीनच्या नाविक विस्तारीकरणाच्या ज्या योजना प्रसिद्ध झाल्या - दक्षिण चिनी समुद्रात केलेला नवीन दावा (नाईन डॅश लाईन); सागरी हितसंबंध आणि हक्क यांसाठी स्थापन केलेली पक्षांतर्गत नवीन समिती, जागतिक स्तरावर सगळ्यात मोठ्या युद्धसज्ज नौकांची बांधणी, दक्षिण चिनी समुद्रात लष्करी तळ उभारणे, हिंदी महासागरात कॉन्टिनेंटल शेल्फ आणि समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशातील विशेष आर्थिक क्षेत्रांसह नागरी समुद्रशास्त्रीय सर्वेक्षणाचा आग्रह धरणे आणि जिबौती इथे उभारलेला पहिला लष्करी तळ - यांतून हे समजते की क्वाडच्या कितीतरी आधी चीनच्या योजना बऱ्याच पुढच्या टप्प्यावर पोचलेल्या होत्या.[127] क्वाडमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्याला प्रत्युत्तर म्हणून बीजिंगने नौदलाचे विस्तारीकरण केले ही शक्यता कमी आहे असे वाटते.

त्रिकोणी संबंधांमधल्या या दोन बाजूंच्या दृष्टीकोन आणि पवित्र्यात इतकी टोकाची भिन्नता असण्याचे कारण हे असू शकते, की भारत आणि चीन दोघेही स्वत:ला सागरी सत्ता समजतात. त्यामुळे, इन्डो-पॅसिफिक प्रदेशात प्रत्येकाची भूमिका काय असेल याबद्दल दोघांचेही दृष्टीकोन एकमेकांशी संलग्न नाहीत.[128] ते एकमेकांशी सुसंगत करायला हवेत. त्यामुळे बीजिंगकरता हिंदी महासागरात सत्ता आणि संधींचा समतोल यात कदाचित बदल होणार नाही, पण भारताला त्याला तोंड देता येईल, आणि त्याचबरोबर चीनदेखील भारत-अमेरिकेदरम्यानच्या वाढत्या संबंधांशी समझोता करू शकेल. सद्यस्थितीत, इन्डो-पॅसिफिकच्या कल्पनेला चीन पूर्णपणे विरोधच करत आहे, कारण त्याचा थेट संबंध तो त्याच्यावरच्या प्रतिबंधाशी लावत आहे. या त्याच्या विचारसरणीमुळे, चीनला एक स्वतंत्र घटक म्हणून भारताचा विचार करायची इच्छा आणि वेळ नाही या भारताच्या समजुतीला खतपाणी मिळण्याची आणि त्यामुळे भारत अस्वस्थ होण्याची शक्यता आहे. बीजिंग असा विचार करतो की, BRI ही चीनच्या वाढीसाठी असलेली एक साधी विकास योजना आहे अशा दृष्टीने भारताने विचार केला, तर भारत आणि चीनमधली विसंगती सहजपणे संपून जाईल. त्याचबरोबर, भारताने त्याची इन्डो-पॅसिफिक योजना सोडून द्यावी कारण ती अमेरिकेच्या चीनला प्रतिबंधित ठेवायच्या आक्रमक धोरणाचा एक भाग आहे. चीनच्या अशा विचारसरणीमुळे याला पुष्टी मिळते, की प्रशांत महासागराच्या प्रदेशातून भारताला पूर्णपणे वगळण्याची चीनची इच्छा आहे, त्याला भारताला हिंदी महासागरापुरतेच मर्यादित ठेवायचे आहे आणि त्या मर्यादित प्रदेशातच आपले ठराविक शत्रुत्व जपायचे आहे. यामुळे भारत-चीन संबंधांमधला तणाव वाढायची शक्यता आहे.

## गलवाननंतर पुढे काय

दोन्ही बाजू समोरच्याचा हेतू आणि वागणूक याबद्दल अविश्वास बाळगून आहेत. दोन्ही पक्ष समोरच्या बाजूच्या कृती वाईट हेतूने प्रेरित आहेत असे समजतात आणि त्याच वेळी स्वत:चे हेतू प्रामाणिक आहेत असे समर्थन करतात. यामुळे, भारताच्या बाजूने असा समज झालेला आहे, की चीन पुरेसा संवेदनशील नाहीये, आणि भारताच्या मुख्य चिंतांप्रती तर तो अलिप्तच आहे. त्याचप्रमाणे, चीनला असे वाटते की चीन भारताप्रती जशी सदिच्छा बाळगतो, त्याप्रमाणे भारत प्रतिसाद देत नाही. या बाबतीत दिलेली स्पष्टीकरणे फेटाळण्याकडे दोन्ही बाजूंचा कल आहे, ज्यातून हे स्पष्ट होते की अविश्वास

खोलवर गेलेला आहे. हेतू आणि वागणुकीपेक्षाही या अविश्वासाचे कारण अधिक गंभीर आहे. आपल्या अस्तित्वाची योग्य रीतीने दखल घेतली जात नाही असे दोन्ही बाजूंना वाटते. भारताला वैफल्य वाटते, कारण स्थानिक पातळीवर आणि जागतिक स्तरावरही भारत एक महत्त्वाचा देश आहे असा सुयोग्य मान चीन भारताला देत नाही. चीनला उलट असे वाटते, की भारत हा चीनसाठी धोकादायक नाही अशी त्याची जी समजूत आहे त्यातूनच त्याचा दयाळू दृष्टीकोन स्पष्ट होतो. बीजिंगला असे वाटते, की चीन अमेरिकेबरोबर जीवन-मृत्यूचा लढा देत असताना भारत मात्र त्यातून स्वत:चा गैर पद्धतीने फायदा करून घेत आहे. खरेतर, अमेरिकेबरोबर विविध कारणांसाठी भारत जवळचे संबंध ठेवू इच्छितो, आणि त्यांचा संबंध चीनशी असेलच, असेही नाही. दुसऱ्या देशातली बदलती अंतर्गत परिस्थिती आणि राजनैतिक वागणुकीचा अर्थ स्वत:च निर्माण केलेल्या गैरसमजुतींनुसार दोन्ही देश लावत आहेत.

ये हैलिन यांनीही असेच मत मांडले आहे. एकमेकांचे अस्तित्व आणि स्थान याबद्दल दोन्ही देशांनी विरोधी समजूत आणि अन्वयार्थ कसे लावले आहेत याबद्दल ते लिहितात. चीन आणि भारत एकमेकांच्या आंतरराष्ट्रीय स्थानाबद्दल वेगवेगळे दृष्टीकोन ठेवतात, एकमेकांच्या विकासाच्या धोरणांबद्दल वेगवेगळ्या समजुती करून घेतात आणि आपसांतल्या द्विपक्षीय संबंधांतून ज्या योजना एकमेकांसाठी राबवल्या जातील त्यांचे संभाव्य फायदे काय असतील याच्या समजुतीतदेखील दोन्ही देशांत अंतर आहे. चीनला असे वाटते, की चीन-भारत संबंध म्हणजे एक ताकदवान देश (चीन) आणि एक कमी ताकदीचा देश (भारत) यांच्यामधला एक अर्थहीन (नॉन-झीरो सम) खेळ आहे, तर भारताला असे वाटते, की दोन समान ताकद असलेल्या देशांमधला कोणताही फायदा न मिळवून देणारा (झीरो सम) हा एक खेळ आहे.[129]

दरम्यान, अंतरा घोषाल सिंग यांनी लिहिले आहे, की २०१३-१५ या काळात चीनने भारताबरोबर एका मोठ्या सत्तासंबंधाची सुरूवात करायचा प्रयत्न केला होता. भारत आणि अमेरिकेचे वाढते संबंध पाहून चीनने धोरणात्मक तडजोड केली होती. त्यातून दोघांच्याही विकासाचे हित साधले जाईल आणि चीन वर्चस्ववादी दिसण्याऐवजी उदार दिसेल असाही हेतू त्यामागे होता, असे त्या लिहितात. पण हे प्रयत्न लवकरच थांबले, कारण मोदी सरकारच्या नेतृत्वाखालचा भारत आता अधिक आत्मविश्वासाने भरलेला, अधिक व्यावहारिक आणि कडक भासायला लागला होता आणि चीनने धोरणीपणाने स्वीकारलेल्या शहाणपणा आणि पवित्र्याला त्याने आव्हान दिले.[130] शी यांच्या नेतृत्वाखाली चीनने आखलेली शेजारी देशांबरोबर संबंध सुधारण्यासाठीची योजना कार्यान्वित झाली, तर चीनच्या परराष्ट्र धोरणात भारताला अधिक महत्त्व दिले जाईल हे सुसंगतच होईल; पण असे करताना चीन जर मोठ्या सत्तेचे समीकरण मांडायचा प्रयत्न करत असेल, तर त्याने भारताशी सल्लामसलत केलेली नाही. चीनला जर मोठेपणा घेऊन आणि दयाळूपणा दाखवत एकत्रित विकास योजना राबवायची इच्छा असेल, तर अजहर, न्युक्लिअर सप्लायर्स ग्रुप आणि चीन-पाकिस्तान-इकॉनॉमिक कॉरिडॉर या त्यानेच राबवलेल्या योजनांमुळे त्यावर पाणी पडले आहे. भारत-चीन संबंधात जर चीनच्या अटींवरच धोरणात्मक तडजोड होणार असेल, तर चीनने कितीही प्रयत्न केले, तरी तो भारताचे सहकार्य कधीही मिळवू शकणार नाही.

एकमेकांच्या अस्तित्वाबद्दल गैरसमजुती असल्यामुळे याचे स्पष्टीकरण मिळू शकेल, की जागतिक पटलावर केंद्रस्थान मिळवण्याच्या चीनच्या इच्छेमुळे भारताला त्याच्या स्थानात आणखी घट झाल्यासारखे वाटत असावे. त्याचवेळी, इन्डो-पॅसिफिकमध्ये भारत-अमेरिका संबंधांना चीन चुकीचे हेतू जोडत असावा. मग प्रश्न असा राहतो, की दोन्ही बाजूंच्या या गैरसमजुती समान आहेत का नाहीत. चीनची महत्त्वाकांक्षा वैश्विक आहे आणि तो सध्या जगावर राज्य करणाऱ्या अमेरिकेशी सर्वंकष शत्रुत्व जोपासत आहे.[131] भारताचे अमेरिकेशी अशा पद्धतीचे शत्रुत्व नाही आणि चीनला जगावर जसे राज्य करायचे आहे, तशी काही भारताची वैश्विक महत्त्वाकांक्षाही नाही. त्यामुळे भारताबरोबर संघर्ष केला तर चीनची अधिक हानी होण्याची शक्यता आहे, उलटे संभवत नाही. चीनने हे लक्षात घेऊन त्याची भारताबद्दलची समजूत बदलणे गरजेचे आहे. स्वत:चे स्वतंत्र परराष्ट्र धोरण असलेले भारत एक महत्त्वाचे सत्ताकेंद्र आहे, असा सुयोग्य सन्मान त्याने भारताला द्यायला हवा. जागतिक पटलावरचे जे देश सध्याच्या आंतरराष्ट्रीय यंत्रणेला नियंत्रित करतात आणि तिच्यावर वर्चस्व गाजवतात त्यांना चीनबद्दल खूप जास्त प्रमाणावर संशय आहे आणि ते चीनला विरोध करण्याची शक्यताही आहे. अशा वेळी चीनशी मैत्रीपूर्ण संबंध नसणारा किंवा त्याच्या विरोधात असलेला भारत देश चीनच्या उदयात अडथळे आणू शकतो. सोप्या शब्दांत सांगायचे, तर दोन्ही देशांनी आपापल्या गैरसमजुती मिटवल्या नाहीत किंवा तोडगा काढला नाही, तर दोन्ही देशांचे नुकसान होऊ शकते, पण चीनकडे गमावण्यासारखे अधिक असू शकते.

हे आव्हान असे आहे : चीनने हा प्रश्न स्वत:लाच विचारायला हवा, की चीनच्या परराष्ट्र धोरणातला भारत-चीन संबंधांचा धोरणात्मक आणि जागतिक पैलू संपूर्णपणे नाहीसाच झाला आहे का, किंवा इतका क्षीण झाला आहे का, की आता द्विपक्षीय वादांना अधिक महत्त्व मिळाले आहे, आणि असे

असेल तर चीनच्या वाढीवर याचे काय परिणाम होतील? भारताने हा प्रश्न स्वत:ला विचारायला हवा, की जगाचे वारे बदलत आहेत का, आणि स्वत:च्या हिताशी कोणतीही तडजोड न करता चीनबरोबर असलेल्या त्याच्या धोरणात काही फेरबदल करणे शक्य आहे का?

## तात्पर्य

द्विपक्षीय संबंधाच्या सत्तराव्या वर्षात हे दोन्ही देश एकमेकांना आडव्या जाणाऱ्या रस्त्यावर उभे आहेत असे दिसते. आता त्यांच्यासमोर चार रस्त्यांचे पर्याय आहेत : संबंध खालावत जाऊन त्यांची लष्करी संघर्षात अखेर होणे; लष्करासहित सह-अस्तित्व; सहकार्य आणि शत्रुत्व या दोन्हींबरोबर सह-अस्तित्व; आणि भागीदारी. सद्य स्थितीत भागीदारी होणे अवघड दिसते. लष्करी संघर्ष हिताचा नाही, कारण त्यामुळे दोन्ही देशांना कमी-अधिक प्रमाणात हानी पोचेल. अशी आशा आहे, की संपूर्ण विजयाची स्वप्ने चीनही बघत नसावा. लष्करी सह-अस्तित्व, आणि सहकार्य आणि शत्रुत्वासहित सह-अस्तित्व यांमध्ये फरक आहे तो विश्वासाचा. सद्य स्थितीत विश्वासाचा संपूर्ण अभाव आहे. हा विश्वास हळूहळू, एकेक पाऊल टाकत निर्माण करावा लागेल. पूर्व लडाखच्या प्रत्यक्ष सीमारेषेने त्याची सुरुवात करता येईल. द्विपक्षीय संबंधाची व्यापक प्रमाणावर बांधणी करत असताना, सीमावादाचा प्रश्न वगळून किंवा बाजूला ठेवून विश्वास संपादन करता येईल अशी कोणतीही कल्पना चीनने बाळगू नये.

राजीव गांधी- डेंग शाओपिंग यांचा समझोता आता संपुष्टात आला आहे. या संबंधांसाठी सीमा हाच कळीचा मुद्दा आहे. चीनने सीमेवर ताबडतोब पूर्वस्थिती (स्टेटस को आन्टे) स्थापित केली, तर त्याने मदत होऊ शकते. त्यानंतर सीमेच्या पश्चिम भागातून आपले अस्तित्व कमी करण्याबाबत आणि तिथून स्वारस्य कमी करण्याबाबत, पुरेशी लेखी हमी घेऊन प्रयत्न करता येतील. सध्या कार्यान्वित आहेत त्याच मार्गांचा अवलंब करून संघर्ष कमी करणे ही एक सकारात्मक बाब होऊ शकते. दोन्ही बाजूंना मान्य असेल असा तोडगा शोधणे हा कळीचा मुद्दा असेल.

